www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ११ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, मंगळवार, १४ मे २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात

### पैसे घेऊन मतदान करणे हे देशाचं दुर्दैव, म्हणूनच.”; अण्णा हजारेंचे मतदारांना आवाहन



● पुणे सचिन कदम :

महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात मतदान पार पडत आहे. राज्यातील ११ मतदार संघामध्ये आज मतदान होत आहे. यात अहमदनगर मतदार संघाचा देखील समावेश आहे. येथून सुजय विखे पाटील आणि नीलेश लंके यांच्यात थेट लढत होत आहे. नुकतेच समाजसेवक अण्णा हजारे यांनी राळेगणसिद्धीमध्ये मतदानाचा अधिकार बजावला आहे. यावेळी अण्णा हजारे यांनी नागरिकांना मतदानाचे आवाहन करत कोणाला मतदान केले पाहिजे, याबाबत सांगितले आहे. पान २ वर

### ठाण्याजवळ सिग्नल यंत्रणेत बिघाड; लोकलचा खोळंबा, चाकरमान्यांचे ऐन गर्दीच्या वेळी हाल!



● ठाणे, विशाल कारंडे :

मुंबईत लोकलच्या सिग्नल यंत्रणेमध्ये झालेल्या बिघाडामुळे सकाळी सकाळी कामाच्या ठिकाणी जाणाऱ्या चाकरमान्यांचे, विद्यार्थ्यांचे हाल झाल्याचं पाहायला मिळाले. ठाण्याजवळ सिग्नल यंत्रणेत बिघाड झाल्याची माहिती मध्य रेल्वेनं एक्सवर (ट्विटर) दिली . या बिघाडामुळे कल्याण ते कुर्ला यादरम्याच्या लोकल सेवेवर मोठा परिणाम झाला. कल्याणहून कुर्ल्याच्या दिशेने जाणाऱ्या लोकल गाड्या तब्बल २० मिनिटं उशीरानं धावत होत्या. काही स्थानकांवर रेल्वे खोळंबल्या. हा बिघाड लवकरात लवकर दुरुस्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचं मध्य रेल्वेकडून सांगण्यात आलं होतं. त्यानुसार सकाळी १०.१५ वाजता बिघाड दुरुस्त झाल्याची माहिती मध्य रेल्वेनं एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये दिली आहे. सोमवारी सकाळी नेहमीप्रमाणे आपल्या कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी मोठ्या संख्येनं चाकरमानी मुंबईच्या दिशेनं निघाले होते. पान २ वर

### मुंबई विद्यापीठाचा विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा निर्णय

# आता परीक्षांची गुणविभागणी बदलणार

● मुंबई, यश सावंत :

देशातील प्रतिष्ठित विद्यापीठंपैकी एक असणाऱ्या मुंबई विद्यापीठानं विद्यार्थ्यांच्या दृष्टीनं नुकताच एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. नव्या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठाच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या परीक्षांदरम्यान ६०-४० ही गुणपद्धती लागू करण्याचा हा निर्णय आता लागू होणार असल्यामुळं येत्या काळात विद्यार्थ्यांना ६० गुणांची लेखी परीक्षा आणि अंतर्गत मुल्यमापनासाठी ४० गुण अशी विभागणी करण्यात येईल.

२०११-२०१२ मध्ये मुंबई विद्यापीठानं पहिल्यांदाज ६०-४०गुण विभागणीची पद्धत अवलंबात आणली




होती. पण, यामध्ये ४० गुणांसाठी घेतल्या जाणाऱ्या अंतर्गत मूल्यमापन पद्धतीमध्ये गैरप्रकार होत असल्याची काही प्रकरणं उघडकीस आली आणि प्रशासनानं यामध्ये लक्ष घातलं. वरील गुणविभागणी सूत्रानुसार सदर वर्षी बी.कॉमचा निकाल ८० ते ८५ टक्क्यांवर पोहोचला होता. निकालासंदर्भातील चौकशीनंतर समोर आलेल्या माहितीनुसार काही महाविद्यालयांमध्ये अंतर्गत मूल्यमापन पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांना अपेक्षेहून अधिक गुण सढळ हस्ते दिल्यामुळं ही वेळ ओढावली होती. पुढं अंतर्गत मूल्यमापनाचा सातत्यानं होणारा गैरवापर पाहता विद्यापीठानं २०१६- १७ मध्ये ही पद्धत मागे घेण्याचा निर्णय घेत ६०-४० गुण विभागणी पूर्णपणे बंद केली होती.

दरम्यान, आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बीएससी, बीकॉम आणि बीए या अभ्यासक्रमांकरता ६०-४० गुणविभागणी पद्धत पुन्हा लागू करण्यात येणार आहे. पान २ वर

### ‘सीईओपी’मधील मतदान केंद्र ठरले ...आगळे वेगळे; मतदारांना आकर्षित करण्यासाठी वापरली ‘ही’ क्लुप्ती




● पुणे, अभिजित येरल्लू :

शिवाजीनगर येथील सीईओपी मतदान केंद्र युनिक मतदान केंद्र ठरले आहे. मतदान केंदात प्रवेश करताच पांढऱ्या शुभ्र पडद्यांवर इतिहासाची साक्ष देणारे पोस्टर लक्ष वेधून घेतात. ही पोस्टर सीईओपीचा इतिहास, माहिती देतात. पुण्याचा सांस्कृतिक इतिहासालाही उजाळा देतात. त्यामुळे हे मतदान केंद्र मतदारराजाचे लक्ष वेधून घेत आहे. पान २वर

### पीओके’त हिंसक आंदोलन

## निदर्शकांशी संघर्षात एका पोलीस अधिकाऱ्याचा मृत्यू, १०० जखमी



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

पाकव्याप्त काश्मीरमध्ये गेल्या आठवड्यात आंदोलक आणि पोलिसांमध्ये संघर्ष होऊन एका पोलीस अधिकाऱ्याचा मृत्यू झाला तर १०० पेक्षा अधिक जण जखमी झाले. जखमींमध्ये बहुसंख्य पोलिसांचा समावेश आहे. पाकिस्तानातील माध्यमांनी रविवारी यासंबंधीचे वृत्त दिले आहे. या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानचे अध्यक्ष आसिफ अली झरदारी यांनी सोमवारी आपात्कालीन बैठक बोलावली आहे. मिरपूरचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक कामरान अली यांनी डॉनला सांगितले की, ‘जम्मू काश्मीर जॉइंट अवामी ॲक्शन कमिटी’ने (जेएएसी) शनिवारी पाकव्याप्त काश्मीरमधील कोटली आणि पूंछ जिल्ह्याचा पाकव्याप्त काश्मीरमधील भाग, येथून मुझफ्फराबादला मोर्चा आयोजित केला होता. तसेच शुक्रवारी चक्काजाम आणि बंदचेही आवाहन केले होते. ‘जेएएसी’ ही पाकव्याप्त काश्-मीरमधील व्यापाऱ्यांची प्रमुख संघटना आहे. प्रदेशात होणाऱ्या जलविद्युत ऊर्जेच्या प्रमाणात विजेचा पुरवठा करण्यात यावा, गव्हाच्या पीठावर अनुदान द्यावे आणि उच्चभ्रू वर्गाचे विशेषाधिकार बंद करावेत या त्यांच्या मुख्य मागण्या होत्या. पान २ वर

## कल्याणमधील नांदिवली, व्दारलीमधील बेकायदा गोदामे, चाळी भुईसपाट



● कल्याण, रोहित जैसवाल :

कल्याण लोकसभा निवडणुकीची धामधूम जोरात सुरू असल्याने कल्याण डोंबिवली पालिकेचा अधिकारी वर्ग निवडणूक कामात व्यस्त आहे, असा विचार करून भूमाफियांनी कल्याण पूर्वेतील व्दारली, नांदिवली तर्फ भागात रस्ते, मोकळया जागा अडवून तेथे बेकायदा गोदामे, बेकायदा चाळी उभारल्या होत्या. याविषयी तक्रारी प्राप्त होताच, आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या निर्देशानुसार आय प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी नऊ गोदामे, याच भागातील बेकायदा चाळी जेसीबी यंत्र आणि तोडकाम पथकाच्या साहाय्याने शुक्रवारी भुईसपाट केल्या.

कल्याण पूर्वेतील मलंगगड रस्त्यावरील नांदिवली तर्फ, व्दारली गाव हद्दीत भूमाफियांनी गाव हद्दीतील मोकळ्या जागा हडप करून तेथे गोदामांची आणि बेकायदा चाळींची बांधकामे सुरू केली आहेत. या बांधकामांना तातडीने रंगरंगोटी करून या गोदामांचा वापर, खोल्यांमध्ये रहिवास सुरू करण्याच्या हालचाली माफियांनी सुरू केल्या होत्या. पान २ वर

## निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर कंपनीतील कामगारांना मतदानासाठी अर्ध्या दिवसाची सवलत

● पनवेल, भावना जैन :

मावळ लोकसभा मतदारसंघात सोमवारी (ता.१३) मतदानासाठी कामगारांना सुट्टी देण्याचे निवडणूक आयोगाचे शासन परिपत्रक असतानासुद्धा तळोजा औद्योगिक वसाहतीमधील अनेक कारखानदारांनी कामगारांना मतदानाची सुट्टी सरसकट न दिल्याने कामगारांनी थेट मावळ मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांपर्यंत संपर्क साधल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कारवाईच्या दट्यानंतर कामगारांना दुपारच्या सत्रातील मतदानासाठी दोन तासांची सवलत देण्यात आली.

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील डब्ल्यू २४ या भूखंडावरील मार्वल ड्रग्स



या कंपनीने सोमवारी निवडणुकीसाठी कामगारांना सुट्टी न दिल्याची माहिती मावळ लोकसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राहुल मुंडके यांना समजल्यावर त्यांनी तातडीने निवडणूक आयोगाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक या कंपनीकडे रवाना केले. पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांनी तातडीने पोलिसांचे पथकसुद्धा कंपनीकडे प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी पाठविल्यावर कंपनीने निवडणुकीसाठी सुट्टी दिली नसल्याचे सिद्ध झाले अखेर निवडणूक आयोगाने कंपनीवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्यानंतर कंपनी व्यवस्थापनाने दोन तासांची सवलत जाहीर करुन कामगारांना निवडणुकीत मतदान करा आणि मतदान केलेले छायाचित्र कंपनीच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर पाठवावा अशा सूचना केल्या.

कंपनी मतदान केलेल्या कामगारांसाठी एक सोडत घेऊन बक्षीस देणार असल्याचे मार्वल कंपनीने काढलेल्या परिपत्रकात म्हटले आहे. विशेष म्हणजे तळोजातील अनेक लहान कारखान्यांनी निवडणुकीत कामगारांना मतदान करता यावे यासाठी काही तासांची सवलत देणे अपेक्षित होते. पान २ वर

### मतदानानंतर कालांतराने वाढलेल्या टक्केवारीवर आक्षेप

## निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार

● वाशीम, नितीन देवळेकर :

यवतमाळ-वाशीम लोकसभा मतदारसंघासाठी झालेल्या मतदानानंतर काही दिवसांनी मतदान टक्केवारीत झालेली वाढ तसेच मतदानाच्या दिवशी झालेला गैरप्रकार आणि समाज माध्यमांवर प्रसारित केले जाणारे मतदानाचे अंदाज यावरून मतदान प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून समनक जनता पार्टीने यावर आक्षेप घेतला आहे. याबाबत जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. तक्रारीनुसार, यवतमाळ-वाशीम लोकसभा मतदारसंघात २६ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. या मतदान प्रक्रियेत ५.८७ टक्के मतदान वाढीच्या अंदाजाचे वृत्त विविध वृत्तपत्रांमधून प्रकाशित झाले होते. मतदान झाल्यानंतर काही दिवसांनी मतदानाच्या टक्केवारीमध्ये वाढ दर्शवण्यात आली. ही वाढ कशी काय होऊ शकते, असा प्रश्न तक्रारीतून करण्यात आला आहे.

मतदानाच्या दिवशी २६ एप्रिल रोजी यवतमाळ



शहर पोलीस ठाण्यात कळंब चौक येथील अंजुमन शाळेच्या मागील भागात बोटाला शाही लावून पैसे वाटत असल्यावरून दोन संशयितांवर गुन्हा दाखल करण्यात आला. हे सर्व प्रकार पाहता मतदान प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर मतदारांची दिशाभूल करणारा विजयी उमेदवारांबाबतचा अंदाज समाज माध्यमांवर प्रसारित केला जात आहे. या अंदाजाला कुठल्याही प्रकारचे ठोस पुरावे तसेच आधार नाही. मग उमेदवाराच्या विजयाचे भाकीत कसे काय वर्तवले जाऊ शकते, असा प्रश्न उपस्थित करीत समनक जनता पार्टीने यावर आक्षेप घेतला असून वेळप्रसंगी न्यायालयात धाव घेण्याचा इशाराही दिला आहे.

# मुंबई, ठाणे, नवी मुंबईत मेघगर्जनेसह पाऊस, उकाड्याने हैराण नागरिकांना मोठा दिलासा

● मुंबई, दिगंबर जाधव :

राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना हैराण करुन सोडणाऱ्या अवकाळी पावसाने आता महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत धडक दिली आहे. हा पाऊस मुंबईत धडकण्याआधी ठाणे जिल्ह्यातील बदलापूर, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ या शरहांमध्ये बरसला. त्यानंतर तो पुढे मुंबईत येऊन धडकला.

राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना हैराण करुन सोडणाऱ्या अवकाळी पावसाने आता



महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत धडक दिली आहे. खरंतर या पावसाला अनेक मुंबईकर पहिला पाऊस मानत असतील. पण हा पहिला पाऊस नाही. या पावसाला ग्रामीण भागात वाळवीचा पाऊस म्हणता. तर मराठी भाषेत सर्वसाधारणपणे अवकाळी पाऊस म्हणतात. या अवकाळी पावसाने राज्यातील अनेक शेतकऱ्यांच्या तोंडातील घास हिरावला. हा पाऊस एकटा आलेला नाही. सोबत वादळही घेऊन आलाय. 40 ते 50 किमी प्रतीतास अशा वेगाने वाहणारे वारे सोबत घेऊन आलाय. तसेच ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाटासह धुमाकूळ घेऊन आलाय. प्रचंड वारा आणि सोबत पावसाच्या सरी आल्यामुळे अनेक नागरिकांची तारांबळ उडाली आहे. हा पाऊस मुंबईत धडकण्याआधी ठाणे जिल्ह्यातील बदलापूर, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ या शहरांमध्ये बरसला. त्यानंतर तो पुढे मुंबईत येऊन धडकला. हा पाऊस इतक्या वेगाने आला की त्याने अवघ्या अर्ध्या तासात मुंबईसह, पालघर आणि नवी मुंबईच्या परिसराला व्यापून टाकलं. मुंबईत तर चांगलाच पाऊस पडला.

राज्यातील शेतकऱ्यांचं अवकाळी पावसामुळे नुकसान झालं असलं तरी मुंबईत आणि लगतच्या इतर शहरांमध्ये उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. कल्याण, डोंबिवली या शहरांमध्ये दुपारच्या वेळी भयंकर ऊन पडत होतं. सूर्य जणू आगच ओकतोय, अशी परिस्थिती होती. पान २ वर

### महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ परिसरात वनविभागाच्या पथकाने बिबट्याला केले जेरबंद



● नाशिक, विशाल पाटील :

शहरापासून दूर असलेल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ परिसरात सोमवारी सकाळी बिबट्यास भुलीचे इंजेक्शन देवून वनविभागाच्या पथकाने ताब्यात घेतले. सोमवारी सकाळी आठच्या सुमारास विद्यापीठातील कर्मचारी आवारात काम करत असतांना अतिथी गृहाजवळ बिबट्या दिसून आला. कर्मचाऱ्यांनी त्वरीत वन विभागाला माहिती दिली. एका कर्मचाऱ्याने बिबट्याला हुसकाविण्याचा प्रयत्न केला असता बिबट्या कर्मचाऱ्यावर धावून गेला. बिबट्याची नखे कर्मचाऱ्याला लागली आहेत. नंतर बिबट्या अतिथी गृहात शिरला. अतिथी गृहातील एका खोलीत ठाण मांडून बसला. वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाल्यावर त्यांनी बिबट्या असलेल्या खोलीचे दार लावून घेतले. खिडकीतून बिबट्याला इंजेक्शन देत बेशुध्द करण्यात आले. बिबट्या बेशुध्द झाल्यानंतर त्याला ताब्यात घेण्यात आले. बिबट्या नर असून तीन ते चार वर्षाचा असल्याची माहिती वन अधिकारी वृषाली गाडे यांनी दिली.

## संपादकीय

# चटके पाणीटंचाईचे

गेल्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्रासह देशभरात आणि जगभरामध्ये पाण्याचा प्रश्न तीव्र बनताना दिसत आहे. पाण्यामुळे तिसरे महायुद्ध होऊ शकते, अशी चर्चा काही वर्षांपूर्वी ऐकायला मिळायची. यंदाच्या जागतिक जलदिनाची थीमही 'शांततेसाठी पाणी' अशी होती. शांतता असेल तर आणि तरच जगाला स्थैर्य आणि भरभराट प्राप्त होऊ शकते. जलसाठे प्रदूषित असतील वा पाण्याचे असमान वितरण असेल तर जगात शांतता नांदू शकत नाही, हा त्यातील मतितार्थ होता. आज महाराष्ट्रासह कर्नाटकादी राज्यांमध्ये येणारा मे महिना आणि जून महिन्यातील मान्सूनचा वर्षाव होईपर्यंतचा काळ कसा काढायचा, याच्या चिंतेत येथील समाजमन आहे. टँकरचे फेरे वाढत चालले आहेत. लांब अंतरावरुन पाणी आणणायांची गर्दी वाढत आहे. ही स्थिती चिंताजनक आहे.

जगातील 3,000,000,000 जनता दुसर्या देशातून आलेल्या पाण्यावर अवलंबून आहे. जगातील 153 देश हे शेजारी राष्ट्रांशी नद्या, तलाव वा जलधर वाटून घेत असताना त्यापैकी फक्त 24 देश असे आहेत की जे शेजारी राष्ट्रांशी पाण्याबाबत सहकार्य करार केलेले आहेत. प्रश्न एवढ्यावरच थांबलेला नाही तर वाढती लोकसंख्या आणि हवामान बदल वा दोन कारणांनी समस्या अधिक विकट बनली आहे. आणि या सर्व बदलत्या परिस्थितीत आपल्याला शाश्वत विकासाचे उद्दिष्ट गाठायचे आहे.

ही निश्चितच एक तारेवरची कसरत आहे. जगातील पाण्यासंबंधात कोणकोणते प्रश्न डोके वर काढत आहेत याची यादीच तयार करायचे ठरवल्यास हवामान बदलामुळे पाणी पुरवठ्यात होणारी अनियमितता, पूरांमुळे आणि दुष्काळांमुळे येणार्या आपत्ती, खालावत जाणारी जैव विविधता, संकटांची तीव्रता कमी करण्यासाठी अर्थप्रबंधन, पाण्यामुळे महिलांवर येणारे ताणतणाव, पाण्यासाठी निगडीत मानवी हक्क, परदेशातून येणार्या जलपुरवठ्यामुळे निर्माण होणारे ताणतणाव, शहरीकरणाशी निगडीत पाणी प्रश्न, अन्न आणि शक्ती सुरक्षितता, वाढत्या लोकसंख्येला पाणी पुरवण्यात येणार्या अडचणी या सारख्या प्रश्नांचा उल्लेख करावा लागेल.

या यादीतील प्रत्येक प्रश्न हा एखाद्या विध्वंसक बाँबसारखा आहे. त्याचा स्फोट केव्हा होईल हे आपण सांगू शकत नाही. पण तो झालाच तर त्याचे परिणाम जागतिक शांततेवर झाल्याशिवाय राहणार नाहीत. जगात आधीच रशिया आणि युक्रेन व इस्त्राइल आणि हमास ही दोन युद्ध चालू आहेत. त्यात पाण्यामुळे अधिक भर पडायला नको असे प्रत्येकाला वाटत असले तरी पाण्यासाठी पराधीन असलेला माणूस कधी विथरेल व शांतता भंग करेल याचा अंदाज करणेही कठीण आहे.

या संदर्भात एक महत्वाचा प्रश्न उपस्थित करण्याचा मोह टाळता येत नाही. ही समस्या निर्माण करणारा माणूस या संबंधात काहीच हालचाल का करत नाही हा प्रश्न विचारला गेलाच पाहिजे. माणसाने या संदर्भात विचार केला नाही तर कोणतेही सरकार हा प्रश्न सोडवू शकत नाही ही काळ्या दगडावरची रेघ आहे. हा प्रश्न सोडवणे तर राहूच द्या तो अधिकाधिक गंभीर कसा बनत जाईल याकडे माणूस जास्त लक्ष देत आहे. असे म्हंटल्यास चुकीचे ठरु नये. दिवसेंदिवस माणसाचा पाण्याचा हव्यास वाढत आहे. अधिक पाणी लागणारे नवनवीन मार्ग तो सध्या शोधत आहे.



### आजची चित्रोळी

बिया कॉफीच्या बघितल्यात कां
लगडल्यात कॉफी वृक्षा !
सगळ्याच पिकल्यावरती बघणें
अपूर्व भासेल किती नक्षा. !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर,**
**विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### पैसे घेऊन मतदान करणे...

"मतदानाचा हक्क बजवल्यानंतर अण्णा हजारेंनी माध्यमांशी संवाद साधला. तेव्हा ते म्हणाले की, "आज लोकशाहीचा मोठा उत्सव असून या उत्सवात सर्वांनी सहभागी झाले पाहिजे. तसेच मतदान करताना चारित्र्यशील आणि निष्कलंक माणसाला मतदान करावे. मतदारांच्या हातात देशाची चावी असल्यामुळे ही चावी योग्य पद्धतीने योग्य कुलपाला लावून योग्य उमेदवार निवडावा. पैसे घेऊन मतदान करणे हे देशाचं दुर्दैव असल्याचे सांगत हा शहीद झालेल्या शहिदांचा अपमान आहे. म्हणूनच निष्कलंक उमेदवारांना निवडून द्या. ईडीसारखे गुन्हे दाखल नसलेल्या उमेदवारांना निवडून द्या," असेही ते यावेळी म्हणाले.

"ज्यांना मतदान करायचे त्यांनी मागच्या काळात काय केले ते पाहणे महत्त्वाचे आहे. तो मतदारसंघासाठी किती झिजला, दिव्यासारखा किती जळला हे पाहणे गरजेचे आहे. ते पाहूनच मतदान करा. खरी लोकशाही आणायची असेल तर मतदारांची जबाबादारी महत्त्वाची आहे. मतदान केले पाहिजे. मी पक्ष पाहत नाही स्त्री किंवा पुरुष असेल तरी त्याचे चारित्र्य चांगले पाहिजे. मतदारांच्या हातात देशाची चावी असल्यामुळे ही चावी योग्य कुलपाला लावून योग्य उमेदवार निवडा," असे आवाहन आण्णा हजारे यांनी नागरिकांना केले.

### निवडणूक आयोगाच्या...

परंतु रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या परिपत्रकाचा दाखल देत रायगड लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीवेळी तळोजातील काही कारखानदारांनी कारखाने बंद ठेवल्याची सबब देण्यात आली. मात्र मावळ लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत कारखानदारांनी काही तासांची सवलत देणे गरजेचे होते असे कामगारांच्यावतीने मागणी करण्यात येत होती.

### मुंबई, ठाणे, नवी मुंबईत...

त्यामुळे नागरीक आतुरतेने पावसाची वाट पाहत होते हे सत्य आहे. अखेर पावसाची वाट पाहणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. कारण मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरात पावसाने हजेरी लावली आहे. नवी मुंबईत आलेला पाऊस सोबत वेगवाने वाऱ्यासह धुळीचं वातावरणही घेऊन आला.

अनेक ठिकाणी पाऊस आणि वारा तर आहेच पण धुळीचं प्रचंड साम्राज्य बघायला मिळत आहे. धुळीमुळे काही ठिकाणी दृष्यमानता कमी झाल्याचं चित्र आहे. मुंबई, ठाणे, पालघर, नवी मुंबई या भागात सकाळी चांगलं वातावरण होतं. सूर्यदेखील आग ओकत होता. पण दुपारी तीन वाजेनंतर अचानक वातावरणात बदल झाला. अचानक ढग दाटून आले, वातावरणात काळोत पसरला. वारे वाहू लागले आणि मेघगर्जनेसह अचानक पावसाला सुरुवात झाली. यावेळी अनेक ठिकाणी धुळीचं साम्राज्य बघायला मिळालं. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांना सावरण्यासाठी वेळच मिळाला नाही. त्यामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली.

### कल्याणमधील नांदिवली...

याविषयीची कुणकुण लागताच आय प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी निवडणूक कामातून वेळ काढून नांदिवली तर्फ, व्दारली येथील गोदामे, बेकायदा चाळी तोडकाम पथक, जेसीबीच्या साहाय्याने शुक्रवारी जमीनदोस्त केल्या. यावेळी गुन्हा दाखल होईल या भीतीने भूमाफियाने पळून गेले होते.

दहा प्रभागांमध्ये आय प्रभागात सर्वाधिक बेकायदा बांधकामांविरुध्द कारवाई सुरू असल्याने माफियांचे कंबरडे मोडले आहे. या सततच्या कारवाईने आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी साहाय्यक आयुक्त मुंबरकर यांच्या आक्रमक कारवाईचे कौतुक केले आहे.

पालिकेच्या डोंबिवली विभागातील ह आणि फ प्रभागात बेफाम बेकायदा बांधकामे सुरू आहेत. परंतु, या प्रभागाचे साहाय्यक आयुक्त आम्ही लोकसभा निवडणूक कामात खूप व्यस्त असे तक्रारदारांना सांगून या बेकायदा बांधकामांना अभय देत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. ह प्रभागात कोपर पश्चिम रेल्वे स्थानकाजवळील शैलेश पाटील यांच्या बेकायदा कोंबड्याच्या खुराड्यावर कारवाई न केल्याने या खुराड्यात कोंबड्या, त्यांची पिल्ले आणून व्यवसाय सुरू करण्यात आला आहे.

ठाकुरवाडीतील भूमाफिया प्रकाश गोठे, शंकर ठाकूर यांच्या फशी हाईट्स, गटारवरील दोन बेकायदा इमारती, जुनी डोंबिवलीतील धिरेंद्र भोईर यांनी तक्रार केलेली शिवलिला, राहुलनगर मधील सुदामा, रमाकांत आर्केड इमारती, कुंभारखाणपाडा हरितपट्ट्यावरील बेकायदा बांधकामे सुरू आहेत.

फ प्रभागात खंबाळपाडा, सुयोग हॉल गल्लीतील आराधना पुनर्निमाणाच्या इमारतीचे बेकायदा बांधकाम वेगाने पूर्ण करण्याच्या हालचाली माफियांनी सुरू केल्या आहेत. आय प्रभागाच्या साहाय्यक आयुक्तांना निवडणूक कामातून बेकायदा बांधकामे तोडण्यासाठी वेळ मिळतो, मग फ आणि ह प्रभागातील अधिकारी बेकायदा बांधकामांविषयी उदासिन का, असे प्रश्न तक्रारदार करत आहेत.

### पीओके'त हिंसक आंदोलन..

मोर्चापूर्वी बुधवारी आणि गुरुवारी मुझफ्फराबाद आणि मिरपूरमध्ये 'जेएएसी'च्या जवळपास ७० कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली, तसेच त्यांच्या निवासस्थानी छापे टाकण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकव्याप्त काश्मीरच्या प्रशासनाने मोर्चा थांबवण्यासाठी मोठ्या प्रमाणात निमलष्करी दल आणि पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. जेएएसीचा मुझफ्फराबादकडे जाणारा मोर्चा थांबवण्यासाठी प्रयत्न करणारे पोलीस आणि कार्यकर्त्यांदरम्यान संघर्ष झाला. त्यादरम्यान, इस्लामगढ येथे निदर्शकांनी केलेल्या गोळीबारात छातीला गोळी लागून पोलीस उपनिरीक्षक अदनान कुरेशी यांचा मृत्यू झाला. तसेच अनेक पोलीस जखमी झाले.

### 'सीईओपी'मधील मतदान...

शहरी मतदारांचा मतदानाला मिळणारा कमी प्रतिसाद निवडणूक आयोगासह प्रशासनासमोरील प्रश्न बनला आहे. मतदान केंद्रांवर प्रौढ, ज्येष्ठ मतदार दिसून येतात पण, तरुणाई दिसून येत नाही. त्यामुळे तरुण मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती व्हावी, आवड निर्माण व्हावी म्हणून पुणे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या (सीईओपी) युवा संसद क्लबच्या विद्यार्थ्यांनी हा उपक्रम निवडणूक आयोगाच्या संयुक्त विद्यमाने सुरू केल्याची माहिती क्लबचे अध्यक्ष स्वप्नील क्षीरसागर यांनी दिली. आलेल्या मतदारांना तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, यासाठी सीईओपीच्या विद्यार्थ्यांनी त्यांनी तयार केलेले भिंत चढणारा रोबोट, विद्यापीठातील निवडणूक प्रक्रिया राबवण्यासाठी ईव्हीएम मशीन, ऑल टेरेन व्हेइकल देखील ठेवली आहे.

### ठाण्याजवळ सिग्नल यंत्रणेत बिघाड...

ठरल्याप्रमाणे त्यांनी नेहमीच्या वेळेची लोकल ट्रेनही पकडली. पण ठाण्याजवळ सिग्नल यंत्रणेत बिघाड झाल्यामुळे अनेक लोकल गाड्या ट्रॅकवर थांबून राहिल्या. या भागात अडकलेल्या लोकलमुळे त्यामागे आणि पुढे असणाऱ्या लोकलही खोळंबल्या. परिणामी मुंबईकरांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

दरम्यान, कामासाठी किंवा इतर पूर्वनियोजित गोष्टींसाठी उशीर होत असल्यामुळे अनेक मुंबईकरांनी जागेवरच खोळंबलेल्या लोकल ट्रेनमधून उतरून चालतच रस्ता गाठण्याचा मार्ग स्वीकारला. ठाणे स्थानकाजवळ थांबलेल्या एसी लोकलचे दरवाजे उघडल्यानंतर तिथूनही अनेकांनी खाली उतरण्याचा मार्ग पत्करला.

### मुंबई विद्यापीठाचा विद्यार्थ्यांसाठी...

त्यासंदर्भातील माहिती विद्यापीठानं एका परिपत्रकाच्या माध्यमातून दिली. या गुणविभागणीचा फायदा शैक्षणिक वर्षात होणार असून अंतर्गत मूल्यमापनाचे गुण गृहित धरले जाणार असणार असल्यामुळं विद्यार्थ्यांची वर्गात अधिक उपस्थिती असेल अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे.

अंतर्गत मूल्यमापन पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्षातील उपस्थिती, प्रात्यक्षिकं, प्रोजेक्ट, टेस्ट आणि असाईन्मेंटचा समावेश असणार आहे. वर्षभर विद्यार्थ्यांचं या निकषांवर मूल्यमापन करण्यात येणार असून, त्या आधारे त्यांना ४० गुणांच्या आधारे गुण देण्यात येतील. ज्यामुळं आता विद्यार्थ्यांना वर्षभरात महाविद्यालयात हजर राहणं जवळपास बांधिल असेल. दरम्यान अद्यापही काही महाविद्यालयांना या आदेशासंदर्भात स्पष्टोक्ती नसल्यामुळं जून महिन्याच्या अखेरपर्यंत चित्र स्पष्ट होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# यंदाची निवडणूकही कांद्याची !

ज्या काळात शेतकऱ्याच्या हाती चार पैसे मिळण्याची शक्यता असते, त्याच काळात त्याचे कान, नाक, डोळे बंद करूनटाकण्याच्या या कारभाराने देशातील शेतकऱ्यांची दमछाक सुरू झाली आहे. ती थांबवायची आणि त्यांचे उत्पन्न दुप्पट करायचे, तर केवळ घोषणा करून भागणार नाही. त्यासाठी जागतिक बाजारपेठेवर लक्ष ठेवून योग्या वेळी योग्य त्या शेतमालाच्या निर्यातीसाठी मदत करण्याची भूमिका आवश्यक असते. नेमका गोंधळ इथेच आहे. उन्हाळी कांदा निर्यातक्षम असतो, कारण तो टिकाऊ असतो. त्याला जागतिक बाजारपेठेत मागणीही असते. यंदा कांद्याचे अपेक्षेप्रमाणे उत्पादन झालेले असताना, तो निर्यात करून चार पैसे मिळवण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या शेतकऱ्यांच्या तोंडाला सरकारने सतत पाने पुसली. निर्यातबंदी हे आता केंद्र सरकारचे हुकमी शस्त्र बनले आहे. त्यामुळे साखर असो, की गहू- निर्यातीला परवानगी देण्याचा प्रश्न आला की सरकार मूग गिळून गप्प बसते. त्यामुळे जिवापाड मेहनत करून शेतमाल पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या पदरात सतत विफलतेचे दान पडते. गुजरातमधील पांढऱ्या कांद्याच्या निर्यातीला मर्यादित प्रमाणात का होईना, केंद्राने परवानगी दिल्याने, अन्य राज्यातील लाल कांद्याच्या उत्पादकांमध्ये निर्माण झालेला रोष कमी करण्यासाठी केंद्राने सशर्त निर्यात करण्यास दिलेली ही परवानगी फारशी उपयोगी ठरण्याची शक्यता नाही.

कांदा उत्पादनात महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर होता. गेल्या काही काळात कर्नाटक, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान या प्रांतातही कांदा मोठ्या प्रमाणात पिकवला जाऊ लागला. त्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेतही महाराष्ट्रातील कांद्याच्या मागणीत घट झाली. राज्यातील कांद्याच्या लागवडीखालील क्षेत्रात गेल्या काही काळात जवळजवळ दुपटीने वाढ झाली. साहजिकच उत्पादनातही वाढ होत गेली. लागवड वाढून उत्पादन वाढले, तरीही मागणीत मात्र घट झाल्याने शेतकऱ्यांसमोरील अडचणींमध्ये भरच पडली. त्यामुळे कांदा उत्पादनाच्या खर्चाएवढाही भाव बाजारात मिळेनासा झाला. कांद्याचा किलोचा खर्च सुमारे १५ ते २० रुपये गृहित धरला, तर बाजारात कांद्याचे भाव त्यापेक्षा जास्त असायला हवेत. प्रत्यक्षात कांद्याचे बाजारातील भाव उत्पादन खर्चापेक्षाही कमी झाल्याने शेतकरी हवालदिल होणे स्वभाविकच. असा स्थितीत निर्यातीला चालना देऊन कांदा उत्पादकांना दिलासा देण्याऐवजी त्यांची घोर फसवणूक करणे, हा त्यांचा अपमानच.

यापूर्वी कांदा निर्यातीला परवानगी दिल्याच्या घोषणा झाल्या, त्या पोकळ ठरल्या. शनिवारी केंद्र सरकारने अधिकृतपणे निर्यातबंदी उठवण्याचा निर्णय जाहीर केला, तरी त्यामध्ये निर्यात मूल्य आणि निर्यातकराची पाचरही मारून ठेवली. त्यामुळे भारतीय कांद्याचे जागतिक बाजारातील भाव इतके वाढतील, की कांद्याला मागणीच राहणार नाही. निर्यातबंदी उठवताना ५५० डॉलर हे निर्यात मूल्य आणि ४० टक्के निर्यात कर लागू केल्यानंतर कांद्याचा किलोमागे दर किमान ७५ रुपयांवर जाईल, असे निरीक्षण आहे. आजमितीस

जागतिक बाजारातील कांद्याचा दर ७५० ते ८०० डॉलर प्रति टन असा आहे. भारताचा कांदा आंतरराष्ट्रीय बाजारात जात नसल्यामुळे तेथील भाव चढे आहेत. जगातील प्रमुख खांदा उत्पादक देश पाकिस्तान, चीन, इराण, तुर्कस्तान आणि इजिप्त आहेत. आपला कांदा त्या बाजारात नसल्यामुळे या देशांनी कांद्याचे भाव चढे ठेवले आहेत. भारतीय कांदा त्या बाजारात उतरलाच तर जागतिक बाजारातील दर उरतण्याची शक्यता व्यक्त केली जाते. तरीही साडेपाचशे डॉलर एवढे किमान निर्यातमूल्य आणि ४० टक्के निर्यातकर यामुळे भारतातील कांदा त्या बाजारात स्पर्धेत टिकून राहील का, असा प्रश्न आहे. त्यामुळे निर्यातबंदी उठवल्याची सरकारी आवई, शेतकऱ्यांच्या अडचणीत भर घालणारीच ठरेल.

केंद्र सरकारने मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यात बंगळुरू 'रोझ' म्हणजे कर्नाटकी गुलाबी कांद्यावरील निर्यात शुल्कात ४० टक्के सवलत जाहीर केली. तेव्हाही कांद्याचे भाव वाढू नयेत आणि तो बाजारात उपलब्ध राहावा, म्हणूनच निर्यातशुल्क लागू करण्यात आले होते. त्याविरुद्ध नाशिकमधील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी मोठे आंदोलनही केले. नंतर केवळ गुलाबी कांद्यापुरती ही सवलत दिल्याने देशातील कांदा उत्पादकांमध्ये आशेचा किरण निर्माण झाला. प्रत्यक्षात निवडणुका संपेपर्यंत निर्यातबंदी उठणार नाही, अशी अटकळ बाजारपेठेतील व्यापारी करतच होते. ती खोटी ठेली, तरी त्याचे परिणाम मात्र तेच राहणार असल्याने सरकारने निर्यातबंदी उठवली नसती, तरी फारसा फरक पडणारच नव्हता.

गेली तीन वर्षे कांद्याच्या पिकाला वेगवेगळ्या कारणांनी अडचणी येत गेल्या. करोना काळात शेजारील देशांत कांदा निर्यात करणे शक्य असतानाही, त्या देशांच्या आर्थिक स्थितीमुळे आणि तेथील आयातशुल्कात वाढ झाल्याने, ती होऊ शकली नाही. त्यानंतर

स्थितीत सुधारणा होण्याची शक्यता निर्माण होत असतानाच निवडणुका उभ्या ठाकल्या आणि केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यातबंदी वाढवण्याचा निर्णय जाहीर करून टाकला. आता तो मागे घेत असताना निर्यातमूल्य आणि निर्यात कर लागू करून मागील दाराने निर्यातबंदी सुरूच ठेवण्याचा निर्धार केला आहे.

कांदा किंवा अन्य शेतमालाच्या साठवणुकीबाबत गेल्या आठ दशकांत भारतात फार मोठी प्रगती झाली नाही. त्याचा फटका उत्पादित शेतमालाला बसतो. साठवणुकीच्या मर्यादित सुविधांमुळे शेतमाल सडून जातो किंवा तो खाण्यायोग्य राहात नाही. कांद्याच्या साठवणुकीसाठी उभारलेल्या कांदा चाळींची हीच दुर्दैवी अवस्था आहे. जगातील सगळ्या प्रगत देशांमध्ये साठवणुकीच्या ज्या आधुनिक सुविधा उभारण्यात आल्या आहेत, त्यामुळे जमिनीतून उगवलेला प्रत्येक दाणा माणसांच्या पोटात कसा जाईल, याची काळजी घेतली जाते. भारताने या क्षेत्रात फारशी प्रगती न केल्याने कितीतरी टन शेतमाल दरवर्षी मोठ्या प्रमाणात वाया जातो. कांदाचाळींची अपुरी व्यवस्था आणि त्यामध्ये नव्या तंत्रज्ञानाचा अभाव, यामुळे कष्टाने घेतलेले कांद्याचे पीक डोळ्यासमोर मातीमोल झाल्याचे पाहणे शेतकऱ्यांच्या वाट्याला येते. जागतिक बाजारपेठेत भारतीय कांद्याला मागणी असतानाही केवळ दर जास्त असल्याने, त्याकडे कानाडोळा होणार असेल, तर त्याची जबाबदारी शेतकऱ्यांवर कशी ढकलता येईल? उलटपक्षी बाजारातील स्पर्धेत टिकून राहण्यासाठी शक्य ती मदत करणे ही जबाबदारी सरकारच झटकून टाकणार असेल, तर त्यात शेतकऱ्यांचा काय दोष?

महाराष्ट्र सरकारने बाजारपेठा आणि विपणन याचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल कागदावरच राहणार असेल, तर या परिस्थितीत सुधारणा कशी होऊ शकेल ? सरकारी पातळीवर हा प्रश्न आंदोलने करूनही जर प्राधान्यक्रमात येत नसेल, तर तो केवळ करंटेपणाच म्हणायला हवा. देशातील एकूण कांद्याच्या उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा पन्नास टक्क्यांच्या आसपास आहे. तरीही महाराष्ट्रात कांद्यावरील प्रक्रिया उद्योग केवळ तीन आहेत. शेजारील गुजरात राज्यातील अशा उद्योगांची संख्या शंभरहून अधिक आहे. महाराष्ट्रात मोठी क्षमता असूनही राज्य सरकारने त्याकडे ढुंकूनही पाहू नये, हे अधिक धोक्याचे.

निवडणुका आणि कांदा यांचा या देशातील संबंध नवा नाही. १९८० मधील निवडणुकांचे वर्णन तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी कांद्याची निवडणूक असे केले होते. शीला दीक्षित दिल्लीच्या मुख्यमंत्री असतानाही कांद्याने त्यावेळी सरकारच्या डोळ्यांत पाणी आणले होते आणि दीक्षित यांना नाशिकची वारी करावी लागली होती. आत्ताही शेतकऱ्यांच्या हिताचा विचार महत्त्वाचा मानणाऱ्या (?) सरकारला कांदा उत्पादक पट्ट्यातील निवडणुकांच्या मतदानापूर्वीच निर्यातबंदी उठवण्याचा निर्णय घ्यावा लागावा, इतके कांदा हे पीक महत्त्वाचे असेल, तर त्यासाठी दीर्घकालीन धोरणांची आखणी करणे आवश्यक. मात्र सरकारला हे कधी लक्षात येईल ?



Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## थोडक्यात



### पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सभेला एक लाख नागरिक उपस्थित राहणार

● कल्याण : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १५ मे रोजी कल्याणमध्ये होणाऱ्या भव्य सभेला एक लाख नागरिक उपस्थित राहतील, अशी माहिती महायुतीचे उमेदवार कपिल पाटील यांनी आज कल्याण येथे पत्रकार परिषदेत दिली. भिवंडी, कल्याण आणि ठाणे लोकसभा मतदारसंघासाठी होणाऱ्या या निवडणुकीतून तिन्ही मतदारसंघात मोदीमय वातावरण निर्माण होईल, असे पाटील यांनी नमूद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून आधारवाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर १५ मे रोजी दुपारी अडीच वाजता मार्गदर्शन केले जाणार आहे. या मैदानाबरोबरच व्यासपीठ व अन्य सुविधांची कपिल पाटील यांनी पाहणी केली. त्यानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात सातत्याने महायुतीला जनतेचे समर्थन मिळत आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची होणारी सभा विक्रमी होईल. तसेच भिवंडी, कल्याण आणि ठाणे लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीत महायुतीच्या तिन्ही उमेदवारांचा विजय होईल, असे कपिल पाटील यांनी सांगितले.

### पत्नीला भर बाजारात पेट्रोल टाकुन पेटवण्याचा प्रयत्न, पती फरार



● किनवट - किनवट शहरालगतच्या गोकुंदा परिसरातील दत्तनगरातील एका युवकाने स्वतःच्या पत्नीच्या अंगावर पेट्रोल ओतून तिला पेटवून दिल्याची खळबळजनक घटना घडली आहे. किनवट पालिकेच्या भाजी मार्केटमध्ये आज शनिवारी दि. ११ रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास ही घटना घडली. दत्तनगर गोकुंदा येथील रहिवाशी असलेली ३५ वर्षीय महिला शनिवारी सायंकाळी ७ च्या दरम्यान गोकुंदा येथून भाजीपाला खरेदीसाठी किनवट पालिकेच्या भाजी मार्केटमध्ये आली होती. भाजीपाला, मसाले व अन्य दुकानांनी गजबजलेल्या मार्केटमधून ती महिला भाजीपाला घेवून घराकडे परतत होती. इतक्यात तिच्या मागावर असलेला तिचा पती अर्जुन सातपुते हा सोनपापडीच्या डब्यात पेट्रोल घेवून आला. आणि त्याने भर बाजारातच पत्नीच्या अंगावर पेट्रोल टाकून तिला पेटवून दिले. या घटनेत ती महिला गंभीररित्या भाजली आहे. प्रसंगावधान दाखवत व्यापाऱ्यांनी पाणी ओतून महिलेला लागलेली आग विझविण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर आरोपी अर्जुन फरार झाला.

### बाईक रॅली द्वारे महिलांनी केली मतदान जनजागृती



● कल्याण : कल्याण पश्चिम मतदारसंघात कल्याण मम्मीज या समूहाने वसंत व्हॅली ते खडकपाडा सर्कल ते साई चौक बाईक रॅली काढून कल्याण शहरातील महिलांना आणि नवीन मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले. मतदान करा, मतदान करा, २० मे ला मतदान करा या घोषणा देत लोकांचे लोकांचे लक्ष वेधले. शनिवारी कल्याण पश्चिम मतदार संघातील "कल्याण मम्मीज" या समुहामार्फत वसंत व्हॅली खडकपाडा सर्कल साई चौक पर्यंत मतदार जनजागृती करिता बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. कल्याण पश्चिम मतदार संघातील स्वीप नोडल प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखालील या रॅली मार्फत कल्याण शहरातील महिलांना आणि नवीन मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

# नीलेश सांबरेंचा संभाजी भिडेंसोबतचा फोटो विरोधकांकडून व्हायरल

## भाजपाच्या पाठिंब्याने आंबेडकरी, मुस्लिम मते विभागण्यासाठी निवडणूक लढत असल्याचा आरोप



● कल्याण : लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदानाचा दिवस जसजसा जवळ येत आहे, तसतसा प्रचाराचा जोर वाढत असून एकमेकांवर आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत. अशातच भिवंडी लोकसभेत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या जिजाऊ संघटनेच्या नीलेश सांबरे यांचा शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे यांच्या सोबतचा फोटो विरोधकांनी सोशल मिडियावर चांगलाच व्हायरल केला आहे. भाजपाच्या पाठिंब्याने बौद्ध, आंबेडकरी, मुस्लिम मते विभागण्यासाठी निवडणूक लढत असल्याचा आरोप सांबरे यांच्यावर करण्यात आला आहे.

भिवंडी लोकसभेसाठी २० मे रोजी मतदान होणार असून भिवंडी लोकसभा मतदार संघात सलग दोनवेळा निवडून आलेल्या पंचायत राज्य मंत्री भाजपाचे कपिल पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे सुरेश म्हात्रे आणि अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांच्या मध्ये तिरंगी लढत होत आहे. हे तिघे उमेदवार कोट्याधीश असून या निवडणूकीत आपणच निवडून येणार असा दावा करीत आहेत. असे असले तरी या मतदारसंघात भिवंडी ग्रामीण, भिवंडी पूर्व, भिवंडी पश्चिम, कल्याण पश्चिम, मुरबाड, शहापुर असे सहा विधानसभा क्षेत्र मोडत आहेत.

अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांच्यामुळे युती आघाडीची गणिते बिघडण्याची शक्यता असून अशातच निलेश सांबरे यांचा संभाजी भिडे यांच्यासोबतचा फोटो सोशल मिडियावर व्हायरल झाला असून याची राजकीय चर्चा मोठ्या प्रमाणात रंगली आहे.

भीमा कोरेगाव घटनेचे षडयंत्र रचणाऱ्या संभाजी भिडे यांच्या समर्थकांस आंबेडकरी मतदार कधीच मतदान करणार नाही. नीलेश सांबरे यांनी आजपर्यंत भाजपा खासदार कपिल पाटील यांच्या बद्दल एकही शब्द उच्चारला नाही. आरएसएस भाजपाच्या छुप्या पाठिंब्याने फक्त बौद्ध, आंबेडकरी आणि मुस्लिम मते कुजविण्यासाठी नीलेश सांबरे अपक्ष म्हणून लढत आहेत. त्याचबरोबर सांबरे यांनी दोन अर्ज भरले होते, एक अपक्ष आणि एक कॉंग्रेसच्या वतीने. महाविकास आघाडीने उमेदवार दिला असतांना देखील केवळ मतदारांची दिशाभूल करण्यासाठी हा प्रकार केला जात असल्याचा आरोप सोशल मिडियावर करण्यात आला आहे. तर गंगाधर हि शक्तिमान है, मतदान करतांना विचार करा अशा पोस्ट सोशल मिडियावर वायरल करण्यात आल्या आहेत.

त्यामुळे संभाजी भिडे यांच्यासोबतचा फोटो हा नीलेश सांबरे यांना डोकेदुखी ठरत असून याचा त्यांना कितपत फटका पडतो किंवा फायदा होतो हे आगामी काळात कळेलच. तर याबाबत सांबरे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही. तर त्यांच्या प्रतिनिधींना याबाबत विचारले असता संपर्क होऊ शकला नाही.

# केलवली गावात पाणीटंचाईचे संकट - पाणी मिळवण्यासाठी महिलांना करावी लागते कसरत



केलवली गावात शासनाने जल जीवन मिशन योजना मंजूर केली असता ठेकेदाराने या ठिकाणी अर्धवट काम केल्याने जलजीवन मिशन पूर्णत्वास गेली नाही. तर भर उन्हात महिलांना पाणी मिळवण्यासाठी कसरत करावी लागत असून शासनाने या ठिकाणची पाणीटंचाई दूर करण्यासाठी पुढाकार घ्यावा, जेणेकरून महिलांना उन्हात पाणी मिळवण्यासाठी कसरत करावी लागणार नाही.
- अक्षय दिसले - युवा सामाजिक कार्यकर्ता

● खोपोली - उन्हाळ्याचे चटके बसायला सुरुवात झाली असून khaलापुर तालुक्यातील ग्रामीण केलवली गावात जल जीवन मिशन योजना शासनाने मंजूर करूनही महिलांना पाणी मिळवण्यासाठी मोठी कसरत करावी लागते, पाणीटंचाईमुळे महिलांना अनेक कामे बाजूला सारून पाण्याची प्रतीक्षा करावी लागते, त्यामुळे महिला वर्गामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. तर शासनाने या ठिकाणची पाणीटंचाई दूर करावी अशी प्रतिक्रिया येथील महिला वर्ग करीत आहे

खालापूर तालुक्यासह अनेक ठिकाणी उन्हामुळे पाण्याचे स्तोत्र कमी झाल्याने अनेक ठिकाणी पाणी टंचाई भेडसावत असताना खालापुर तालुक्यातील ग्रामीण बीडखुर्द ग्रामपंचायत हद्दीतील केलवली गावातही पाणी टंचाईचे संकट उभे ठाकल्याने महिलांसह ग्रामस्थापुढे मोठी समस्या उभी राहिली आहे, पाणी मिळवण्यासाठी महिलांना मोठी कसरत करावी लागत आहे त्यामुळे महिला वर्गांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे शासनाने या ठिकाणची पाणीटंचाई दूर करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी प्रतिक्रिया येथील महिला वर्ग करत आहे.

तर महिला वर्गांना कपडे धुण्यासाठी गावापासून कोसोदूर किंवा रेल्वेने प्रवास करत खोपोली गाठत पाताळगंगा नदीचा तीर गाठावा लागतोय, त्यामुळे महिलांना पाण्याबाबत अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून शासनाने याचे गांभीर्य घेत या ठिकाणची पाणीटंचाई ची समस्या दूर करावी, अशी प्रतिक्रिया युवा सामाजिक कार्यकर्ते जयेश कर्णुक यांनी व्यक्त केले.

# समाज बांधवांनो! समाज कल्याण च्या वसतिगृह व शाळांचा लाभ घ्या - डॉ. जयपाल पाटील

● अलिबाग - विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघर्ष करा, आणि संघटित व्हा असा दिलेला संदेश आपल्या समाजातील मुला मुलींनी शैक्षणिक प्रगती करून आपल्या आई-वडिलांचे व गावाचे नाव उंच करावे असे मार्गदर्शन पंचशील बौद्ध मंडळ खंडाळे अलिबाग यांनी आयोजित केलेल्या आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमात समाज भूषण, आपत्तीव्यवस्थापन तज्ञ, रायगड भूषण प्रा. डॉ. जयपाल पाटील यांनी सांगितले.व्यासपीठावर मंडळाचे अध्यक्ष. मंगेश मोरे. उपाध्यक्ष. वैष्णवी कदम. प्रा. डॉ.जयपाल पाटील. उपस्थित होते. प्रारंभी दीप प्रज्वलन. बुद्धाची प्रार्थना म्हणण्यात आली. यानंतर पुरस्कार प्राप्त जयपाल पाटील यांचे.

गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. प्रस्ताविकात प्रा.जयपाल पाटील यांच्या. समाजसेवेबाबत उपस्थित त्यांना माहिती. व आपल्या समाज बांधवांना कायम आरोग्याबाबत. मदत करणारे असून त्यांना अलिबाग तालुक्यात प्रथमच हा महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांना आपल्या मंडळामार्फत बोलावले आहे. यावेळी प्रा.जयपाल पाटील यांनी रायगड जिल्ह्यात शासनाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे मोफत चालविले जाणारे अलिबाग, पनवेल, पाली व महाड येथील मुलींचे वसतिगृह व मुलांसाठी अलिबाग, तळा, महाड येथील व जावळी माणगाव येथील 10वी पर्यंतचे माध्यमिक विद्यामंदिर याचा आपल्या समाजातील गोरगरीब, गरजवंतांनी शिक्षणासाठी लाभ घ्यावा असे सांगितले.



यावेळी कधी केव्हाही अपघात प्रसंगी. 108 रुग्णवाहिकेचा वापर कसा करावा. आपली मुलगी बाळंतपणासाठी बाहेर आल्यावर तिला जिल्हा रुग्णालयात नेण्यासाठी 102 रुग्णवाहिकेचा वापर कसा करावा. पावसाळा आता जवळ आल्याने काही वेळा वीजा कोसळतात. त्यासाठी केंद्र सरकारने "दामिनी" ॲप काढला असून विजय बाबत सुरक्षेची माहिती मोबाईलवर कशी मिळते. महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र पोलिसांचा 112 क्रमांकाचा वापर कसा करावा.

या माहिती सोबतच महिलांनी आपल्या घरातील गॅसची काळजी कशी घ्यावी. त्याचबरोबर. विहाराच्या ग्रंथालयास संविधानाची प्रत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांवरील पुस्तक आपत्ती सुरक्षेची पुस्तके भेट दिली. यापुढे असा कार्यक्रम तालुक्यात जिल्ह्यात आपल्या समाजातील महिला पुरुषांसाठी बुद्ध विहारात करणार असल्याचे सांगितले. यावेळी ॲड. अनुष्का गायकवाड, प्रीती रघुनाथ मोरे, प्रतिभा मोरे, पांडुरंग मोरे व समाज बांधव व महिला उपस्थित होत्या. शेवटी आभार प्रदर्शन मंडळाच्या सचिव सिमरन ओहाळ यांनी मानले.

# ठाण्यात शिंदे गटाच्या माजी नगरसेवकाकडून एकाला मारहाण

● ठाणे : ठाण्यातील शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक संजय पांडे यांनी एका व्यक्तीला मारहाण केली होती. या मारहाणीप्रकरणी रविवारी रात्री त्यांच्याविरोधात अदखलपात्र गुन्ह्याची (एन. सी.) नोंद करण्यात आली आहे. नागरिकांनी मारहाणीचे चित्रीकरण समाजमाध्यमावर प्रसारित झाल्यानंतर हा मारहाणीचा प्रकार उघडकीस आला आहे.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते ठाण्यात राहात असून त्यांनी घरे पुनर्विकासासाठी संजय पांडे यांच्याकडे दिली होती. पुनर्विकास होईपर्यंत तेथील रहिवाशांना घरभाडे दिले जाते. मागील १४ महिन्यांपासून त्यांना संजय पांडे यांनी घरभाडे दिले नाही. त्यामुळे तक्रारदार आणि त्यांच्यासह त्यांच्या परिसरातील नागरिक रविवारी दुपारी संजय पांडे यांच्या घरी गेले होते. त्यावेळी संजय पांडे यांनी रहिवाशांना शिवीगाळ केली. तसेच तक्रारदार यांना मारहाण केली. या मारहाणीचे चित्रीकरण समाजमाध्यमांवर प्रसारित झाले. तक्रारदार यांनी तात्काळ चितळसर मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीनुसार याप्रकरणी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

संजय पांडे हे पूर्वी भाजपमध्ये होते. भाजपमधून तिकिट मिळवत त्यांनी २०१४ च्या विधानसभा निवडणूकीत ओवळा माजीवडा मतदारसंघातून आमदार प्रताप सरनाईक यांना कडवे आव्हान दिले होते. त्यामुळे प्रताप सरनाईक यांचा निसटता विजय झाला होता.

# अंबरनाथमधील अतिरिक्त एमआयडीसी रस्ते भागात दररोजच्या वाहन कोंडीने प्रवासी हैराण

● अंबरनाथ : काटई-बदलापूर रस्त्यावरील नेवाळी ते अतिरिक्त अंबरनाथ एमआयडीसी भागात मुख्य रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाचे काम सुरू आहे. हे काम सध्या अतिरिक्त अंबरनाथ एमआयडीसी क्षेत्रात सुरू आहे. सर्वाधिक वर्दळीचा हा रस्ता असल्याने सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत या रस्त्यावर तुफान वाहन कोंडी होत आहे.

गेल्या महिन्यापासून हा प्रकार सुरू आहे. या वाहन कोंडीने प्रवासी, वाहन चालक हैराण आहेत. कर्जत, मुरबाड, नेरळ, बदलापूर, अंबरनाथ भागातून येणारे प्रवासी ठाणे, मुंबई, नवी मुंबईत जाण्यासाठी या रस्त्याचा प्राधान्याने वापर करतात. ठाणे, मुंबई, नवी मुंबईतून उलट मार्गाने जाणारे प्रवासी याच रस्त्याला प्राधान्य देतात. सर्वाधिक वाहन वर्दळीचा रस्ता सतत वाहन कोंडीत अडकत असल्याने प्रवासी संतप्त



आहेत. अनेक नोकरदार सकाळच्या वेळेत कामावर जाण्यासाठी या रस्त्याने निघतात. ते या कोंडीत अडकून पडत असल्याने त्यांना कामावर जाण्यासाठी दररोज उशीर होतो. यामध्ये एसटी. परिवहन सेवेच्या बसचा समावेश असतो. कोंडी झाली की दुचाकी स्वार सुसाट वेगाने वाहने पुढे नेऊन रस्त्याची दुसरी मार्गिका बंद करून टाकतात. त्यामुळे कोंडीत आणखी भर पडते. या भागात वाहतूक पोलीस, सेवक तैनात असतात. पण दुप्पट वाहन भारामुळे कोंडी सोडविताना त्यांची दमछाक होते. कामावरून घरी परतताना प्रवाशांचे या कोंडीत हाल होत आहेत.

अतिरिक्त अंबरनाथ एमआयडीसी भागात मालवाहू अवजड वाहनांची वर्दळ असते. या वाहनांची भर या गर्दीत पडते. कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर शहरांमधील वाहन कोंडीतून जाण्यापेक्षा प्रवासी या शहरांबाहेर जामाऱ्या काटई ते कर्जत या रस्त्याला प्राधान्य देतात. या रस्त्यावर अतिरिक्त एमआयडीसी अंबरनाथ भागात सतत कोंडी होत असल्याने प्रवासी हैराण आहेत.

# रासायनिक खते, बियाणे, विक्रेते, उत्पादक व गुणनियंत्रण निरीक्षक यांची खरीप हंगाम पूर्व आढावा सभा संपन्न

● ठाणे - ठाणे जिल्ह्यातील सन २०२४ मधील खरीप हंगाम पूर्व आढावा सभा जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडली. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दिपक कुटे यांनी खते व बियाणे विक्रेत्यांनी कायदेशीर तरतुदींना अधिन राहून व्यवसाय करावा असे स्पष्ट केले. बोगस बियाणे, खते व औषधे विक्री करताना कोणी आढळल्यास त्यांच्याविरूध्द कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला. क्षेत्रिय कर्मचाऱ्याच्या मार्फत रँडमली शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतांचे तपासणी करुन माहिती घ्यावी व पावत्यांना न देता विक्री करणाऱ्या विक्रेते व व्यक्तीविरुध्द सदरील खते बोगस आहेत असे समजून पोलीस कारवाई करणेत येईल. सर्व विक्री केंद्रांची हंगामपूर्व 100% तपासणी करण्याच्या सूचना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिल्या.

खरीप 2024 हंगामात खताची टंचाई भासणार नाही व शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्वक खते रास्त दरात मिळतील या संदर्भात सर्वतोपरी काळजी घेण्याबाबत सर्व उपस्थितांना सांगितले. खरीप हंगाम सुरळीत जावा याकरिता सर्व यंत्रणांनी एकत्रित काम करावे असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दिपक कुटे यांनी केले.

ठाणे जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी रामेश्वर पाचे यांनी ठाणे जिल्ह्यासाठी 10,000 मे.टन रासायनिक खतांचे आवंटन मंजूर झाल्याचे सांगितले. रासायनिक खतांचे शेतकऱ्यांना विक्री करतांना पॉस मशिनद्वारेच करावी.



खत वाटप होत असताना शेतकऱ्यांना लिंकिंगच्या समस्येला तोंड देण्याच्या तक्रारी प्राप्त होतात, त्याकरिता अशा प्रकारच्या तक्रारीची गंभीर दखल घेण्यात येईल व खताबरोबर इतर अनावश्यक निविष्ठा शेतकऱ्यांना सक्तीने विकल्या जाणार नाहीत याबद्दल सर्व वितरकांना सक्त सूचना दिल्या. अन्यथा विक्रेत्यांविरूध्द कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला. जिल्ह्यामध्ये नॅनो युरिया व नॅनो डिएपी प्रभावीपणे वापराचे प्रोत्साहन देण्यासाठी विस्तार योजनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे व त्याचा वापर वाढविण्याकरिता भर देण्यात यावा अशा सूचना सर्व क्षेत्रिय अधिकारी व उपस्थितांना दिल्या.

यावेळी मा. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दिपक कुटे, कृषि विकास अधिकारी रामेश्वर पाचे, उपविभागिय कृषि अधिकारी सुधीर नईनवाड, जिल्हा मृद सर्वेक्षण व मृदा चाचणी अधिकारी रूपाली काळे, भिवंडी, कल्याण, उल्हासनगर, मुरबाड या तालुक्यांचे तालुका कृषि अधिकारी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक सचिन फुले, बाळासाहेब माने, कृषि अधिकारी, जिल्हा मृद चाचणी अधिकारी कार्यालय, ठाणे, पंचायत समिती कडील सर्व कृषि अधिकारी, खते- बियाणे उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी व जिल्हयातुन आलेले सर्व खते व बियाण्यांचे घाऊक विक्रेते उपस्थित होते.


या सभेत IFFCO चे प्रतिनिधी निमिष पवार यांनी नॅनो युरीया व नॅनो डीएपी च्या वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. नॅनो युरीयामुळे पिकांच्या उत्पन्नावर कोणत्याही प्रकारचा नकारात्मक परिणाम होत नसल्याचे व उत्पादकतेमध्ये वाढ व खर्चात बचत होऊन शेतकऱ्यांच्या एकूण उत्पन्नात वाढ होते. त्याचप्रमाणे पिकांच्या पौष्टीकतेमध्ये व गुणवत्तेमध्ये फरक पडतो. जमीन, हवा व पाणी यांची गुणवत्ता सुधारते. अशा प्रकारचे फायदे नॅनो युरीया व नॅनो डीएपीच्या वापरामुळे होतात अशी सविस्तर माहिती सभेत देण्यात आली.

# हॉलीवूड कलाकारानंतर आता बॉलीवूड स्टार हृतिक रोशनने केली ॲपलच्या 'त्या' जाहिरातीवर टीका

● मुंबई - बॉलीवूड स्टार हृतिक रोशन सध्या चर्चेत आहे. हृतिक क्वचितच आपलं परखड मत सोशल मीडियावर मांडत असतो. पण नुकतीच हृतिकनं त्याच्या अधिकृत इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे; ज्यामध्ये त्यानं ॲपल कंपनीच्या आयपॅडच्या एका जाहिरातीवर टीका केली आहे. त्याच्या या पोस्टनं प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलं आहे.

हृतिक रोशननं त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक पोस्ट शेअर केली. ॲपलच्या 'आयपॅड प्रो २०२४' (iPad Pro 2024)च्या रीलिजच्या जाहिरातीवर त्यानं टीका केली आणि लिहिलं, "नवीन ॲपलची जाहिरात किती दुःखी आणि अज्ञानी आहे."

ॲपल कंपनीचे सीईओ टिम कूक यांनी मंगळवारी त्यांच्या अधिकृत एक्स अकाउंटवर एक जाहिरात शेअर केली होती. तेव्हापासून या जाहिरातीवर अनेक नकारात्मक प्रतिक्रिया आल्या आहेत. ॲपल कंपनीच्या 'लेट लूज' लॉंच इव्हेंटमध्ये नवीन आयपॅड्सचे अनावरण केल्यानंतर अनेक सेलिब्रिटी आणि कलाकारांसह जगभरातील हजारो लोकांनी या 'क्रश' नावाच्या जाहिरातीवर टीका केली.



त्याचं झालं असं की, काही दिवसांपूर्वी ॲपलचे सीईओ टिम कूक यांनी एक्स अकाउंटवर ही जाहिरात शेअर केली होती. ही जाहिरात शेअर करीत सीईओ टिम कूकनी लिहिलं होतं, "हा आम्ही तयार केलेले सर्वांत पातळ प्रॉडक्ट आहे. एम ४ चिपच्या अविश्वसनीय सामर्थ्यानं आम्ही आतापर्यंत उत्पादित केलेला सर्वांत प्रगत डिस्प्ले या प्रॉडक्टमध्ये आहे. फक्त कल्पना करा की, हे प्रॉडक्ट अजून किती गोष्टी तयार करू शकतं."

'ॲड एज'च्या वृत्तानुसार, ॲपलने या जाहिरातीबद्दल माफी मागितली आहे आणि ही जाहिरात टेलिव्हिजनवर न चालविण्याचा निर्णय घेतला. 'ॲड एज'ला जारी केलेल्या एका निवेदनात, ॲपल, मार्केटिंग कम्युनिकेशन्सचे व्हीपी (VP) टोर मायरेन म्हणाले, "आमच्या डीएनएमध्ये क्रिएटिव्हीटी आहे. जगभरातील क्रिएटिव्हजना सक्षम करणारे प्रॉडक्ट्स डिझाइन करणे आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. वापरकर्त्यांना स्वतःला व्यक्त करण्यासाठी असंख्य मार्ग असले पाहिजेत आणि आयपॅडद्वारे त्यांच्या या मार्गांना, कल्पनांना आम्ही सत्यात उतरवू पाहतो. ते आमचं नेहमीच ध्येय राहिलं आहे. या व्हिडीओमुळे आम्ही जे दाखविण्याचा प्रयत्न करीत होतो, त्याचा मार्ग चुकला आणि त्यासाठी आम्ही दिलगिरी व्यक्त करतो."

तथापि, एक्स अकाउंटवर टिम कूकची ही पोस्ट अजूनही आहे आणि ही जाहिरात अद्याप ॲपलच्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर आहे.



## बाबर आझम ठरला टी-२० मधील सर्वोत्कृष्ट कर्णधार, रोहित-धोनी जवळपासही नाहीत; पाहा यादी

● पाकिस्तान - पाकिस्तान विरूद्ध आयर्लंडमध्ये सध्या टी-२० मालिका खेळवली जात आहे. कर्णधार बाबर आझमच्या नेतृत्त्वाखाली पाकिस्तानचा संघ खेळत आहे. या मालिकेतील आयर्लंडविरूद्धचा दुसरा सामना जिंकत बाबर आझमने आपल्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद केली आहे. बनून रेकॉर्ड बुकमध्ये आपले नाव नोंदवले आहे. पाकिस्तान विरुद्ध आयर्लंड दुसरा टी-२० सामना जिंकून त्याने ही कामगिरी केली. पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम पुरुषांच्या टी-२० क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक विजय मिळवणारा कर्णधार ठरला आहे.

आयर्लंडने दिलेल्या १९३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानने तीन षटके शिल्लक असताना सामना जिंकून मालिकेत बरोबरी साधली. पाकिस्तानच्या या विजयात मोहम्मद रिझवान (७५*) आणि फखर जमान (७८) यांच्यात १४० धावांची भागीदारी निर्णायक ठरली आणि त्यामुळेच पाकिस्तानने आयर्लंडवर ७ विकेट्सने विजय मिळवला. या सामन्यात बाबर आझम गोल्डन डकवर बाद झाला होता.

आयर्लंडवरील या विजयासह पाकिस्तान संघाने बाबर आझमच्या नेतृत्त्वाखालील ४५ वा टी-२० सामना जिंकला. यासह, त्याने अनेक दिग्गज कर्णधारांना मागे टाकले आहे. युगांडाचा कर्णधार ब्रायन मसाबा या यादीत ४४ टी-२० विजयांसह दुसऱ्या स्थानी आहे. तर इंग्लंडच्या २०१९ मधील वर्ल्डकप जिंकणारा कर्णधार इयॉन मॉर्गन आणि अफगाणिस्तानच्या असगर अफगाण बरोबरी साधत ४२ विजयांसह तिसऱ्या स्थानी आहेत. तर भारताचे कर्णधार एम एस धोनी आणि रोहित शर्मा ४१ विजयांसह बरोबरीत आहेत.

## प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेत्रीचा भीषण कार अपघातात मृत्यू, बहिणीसह इतर ३ जण गंभीर जखमी

● हैदराबाद - कन्नड मालिकाविश्वातून एक दुख:द बातमी सध्या समोर येत आहे. प्रसिद्ध अभिनेत्री पवित्रा जयराम हिचा भीषण कार अपघातामध्ये मृत्यू झाला. हैदराबादच्या मेहबूब नगरजवळ हा अपघात झाला असल्याची माहिती सध्या समोर येत आहे. तिच्या कारची एका बसला धडक बसली. ही धडक इतकी भीषण होती की, अभिनेत्रीचा जागीच मृत्यू झाला.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, कर्नाटकातील मंड्या जिल्ह्यातील हनाकेरे येथून परत येत असताना हा



अपघात झाल्याची दिली. तसेच या अपघातामध्ये पवित्रा जयरामचा चुलत भाऊ अपेक्षा, चालक श्रीकांत आणि अभिनेता चंद्रकांत हे देखील गंभीर झाल्याची माहिती सध्या समोर आली आहे. कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने तिची कार डिव्हायडरला धडकली आणि त्यानंतर हैदराबादहून वानपर्थीकडे येणारी बस ही कारच्या उजव्या बाजूला जाऊन धडकली, असंही सांगण्यात येत आहे. पण या अपघातामध्ये पवित्राचा मृत्यू झाला.


पवित्रा जयराम ही कन्नड मालिकाविश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री आहेत. दरम्यान तिने इतर अनेक भाषांमध्येही मालिकेत काम केलं आहे. पण कन्नड मालिकाविश्वात तिची लोकप्रियता जास्त होती. तेलुगु मालिकांमधील आपल्या दमदार अभिनयाने तिचा एक मोठा चाहतावर्गही होता. दरम्यान तिच्या मृत्यूच्या बातमीने इंडस्ट्रीत तिच्या सहकलाकारांना आणि चाहत्यांना देखील धक्का बसला आहे.

परंतु या अपघातासंदर्भात अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाहीये. त्याचप्रमाणे सोशल मीडियावरुनही तिला श्रद्धांजली वाहिली जात आहे. मालिकाविश्वात विशेष करुन कन्नड आणि तेलुगु मालिकांमध्ये तिचं विशेष योगदान आहे.

## खरंच किती वेळ च्युइंगम चघळावा

अनेकांना च्युइंगम खायला खुप आवडते. विशेषतः आजच्या मुलांना च्युइंगम खायला आवडते. च्युइंगम खाणे आपल्या आरोग्यासाठी चांगले असते, असेही तज्ज्ञ सांगतात. ते चघळल्याने दात किडण्याचा धोका कमी होतो आणि आपले जबडे सक्रिय होतात, ज्यामुळे ते मजबूत राहतात.

याशिवाय तोंडातील खराब बॅक्टेरियाचे प्रमाण ७५% कमी होते. तसेच जेवणानंतर च्युइंगम चघळल्याने लाळेचा प्रवाह वाढतो. हे हानिकारक शर्करा फिल्टर करण्यास मदत करते, जे तुमच्या तोंडातील बॅक्टेरियांना खाद्य देतात. म्हणूनच दंतवैद्य दातांच्या समस्यांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना च्युइंगम चघलळण्याचा सल्ला देतात. पण असे नाही की च्युइंगमचे फक्त फायदे आहेत, त्याचे काही तोटे देखील आहेत. जेव्हा तुम्ही आवश्यकतेपेक्षा जास्त वेळ च्युइंगम चघळता तेव्हा अनेक समस्या निर्माण होऊ



शकतात. यामुळे च्युइंगम किती वेळ चघळावे हा जाणून घेणे गरजेचे आहे.

किती वेळ चघळावे च्युइंगम?

डेलीमेलच्या रिपोर्टनुसार, जर च्युइंगम खाल्ल्याने दातांची किड कमी होऊ शकते तर शुगर फ्री च्युइंगमचे सेवन करावे. एक च्युइंगम १५ मिनिटं चघळावे. नंतर तो तोंडातून काढून टाकावा. च्युइंगममुळे तुम्हाला अनेक फायदे मिळतात आणि तुमच्या चेहऱ्याचे स्नायू मजबूत होतात, पण जास्त वेळ च्युइंगम चघळल्याने तुमच्या दातांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते.

काही तज्ज्ञांच्या मते जर एखादी व्यक्ती जास्त वेळ च्युइंगम चघळत असेल तर त्यामुळे दातांचा वरचा थर, ज्याला इनॅमल म्हणतात तो कमी होऊ शकतो. यामुळे दातांमध्ये डिमिनेरलायझेशन होते. म्हणूनच, जर तुम्हाला तुमच्या दातांमध्ये कोणत्याही प्रकारची समस्या असेल च्युइंगम खाण्यापूर्वी दंतवैद्याचा सल्ला घ्यावा.

कोणते नुकसान होऊ शकतात?

तासंतास च्युइंगम चघळल्यास हिरड्या कमजोर होऊ शकतात असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. एकच च्युइंगम तासंतास चघळल्याने टेम्पोरोमॅन्डिब्युलर जॉइंट्स (TMJ) चा त्रास असलेल्या लोकांच्या समस्या वाढू शकतात. टीएमजे हे दोन सांधे आहेत जे खालच्या जबड्याला कवटीला जोडतात. त्यामुळे तासंतास च्युइंगम चघळू नका आणि जर तुम्हाला रोज च्युइंगम खायला आवडत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

## दिनविशेष

**घटना**

२०२२: भारताने गहू निर्यातीवर तात्काळ बंदी घातली. उष्णतेच्या लाटेमुळे उत्पादन अंदाजापेक्षा कमी झाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. १९९७: इंदिरा गांधी भारतीय मिहिला विकास सहकारी साखर कारखाना - देशातील आणि महाराष्ट्रातील पहिल्या महिला सहकारी साखर कारखान्याची सुरुवात नोंदणी झाली.

१९६३ : कुवेत - देशाचा संयुक्त राष्ट्रसंघात प्रवेश.

१९६०: एअर इंडिया - कंपनीची मुंबई ते न्यूयॉर्क विमानसेवा सुरू झाली.

१९५५: वॉर्सा करार - सोविएत रशिया, अल्बानिया, बल्गेरिया, झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, पोलंड, रुमानिया आणि पूर्व जर्मनी या कम्युनिस्ट राष्ट्रांचा वीस वर्षांचा परस्पर संरक्षणासाठीचा वॉर्सा करार पोलंडमधील वॉर्सा येथे झाला.

**जन्म**

१९९८: तरुणी सचदेव - लोकप्रसिध्द पेय रसनाच्या जाहिरातीतील बालकलाकार (निधन : १४ मे २०१२ ) १९८४ : मार्क झुकरबर्ग - फेसबुकचे सहसंस्थापक

१९८१ : प्रणव मिस्त्री भारतीय संगणक शास्त्रज्ञ

१९२६: डॉ. इंदुताई पटवर्धन - भारतीय समाजसेविका व आनंदग्रामच्या संस्थापिका (निधन: ८ फेब्रुवारी १९९९)

१९२२: फ्रांजो तुममन - क्रोएशिया देशाचे पहिले अध्यक्ष (निधन: १० डिसेंबर १९९९)

१९०९: वसंत शिंदे - विनोदसम्राट - कलागौरव पुरस्कार, चित्रभूषण पुरस्कार व बालगंधर्व पुरस्कार (निधन: ४ जुलै १९९९)

१८९८: हेस्टिंग्ज बांदा - मलावी देशाचे पहिले अध्यक्ष (निधन: २५ नोव्हेंबर १९९७)

**निधन**

२०२२: अँड्र्यू सायमंड्स - ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू (जन्म: ९ जून १९७५)

२०२२ : उर्वशी वैद - भारतीय-अमेरिकन LGBT कार्यकर्त्या, वकील आणि लेखिका (जन्म: ८ ऑक्टोबर १९५८)

२०२२: जगदंबा प्रसाद निगम भारतीय राजकारणी, मध्यप्रदेशचे आमदार (जन्म: २० फेब्रुवारी १९२८)

२०१३ : असगर अली इंजिनिअर भारतीय लेखक (जन्म: १० मार्च १९३९)

२०१२: तरुणी सचदेव - लोकप्रसिध्द पेय रसनाच्या जाहिरातीतील बालकलाकार (जन्म: १४ मे १९९८)

## कोरियन स्किनची अवघ्या जगाला भुरळ!

आजकाल कोरियन स्किनचा ट्रेंड सर्वत्र सुरू आहे. तर या ट्रेंडची अवघ्या जगाला भुरळ पडलीय. अगदी नितळ आणि काचेसारख्या चमकणाऱ्या त्वचेच्या प्रेमात विविध प्रॉडक्ट्सचा वापर करताना दिसत आहे. आजकाल आपण पाहतो, सौंदर्याचा ट्रेंड दिवसेंदिवस बदलत आहे. या बदलत्या ट्रेंडमध्ये काहीतरी नवीन पाहायला मिळत आहे. आजकाल कोरियन सौंदर्याचे युग सुरू आहे. अशा परिस्थितीत प्रत्येकाला आपली त्वचा कोरियन लोकांसारखी काचेसारखी चमकदार दिसावी असे वाटते. आरशासारखी चमकणारी त्वचा मिळवण्यासाठी महागडी उत्पादने वापरण्याऐवजी घरगुती वस्तूंपासून बनवलेले फेशियल लावावे. तर आज आम्ही तुम्हाला कोरियन फेशियल करण्याचा एक सोपा उपाय सांगणार आहोत आणि तेही घरच्या घरी. तसेच, त्वचेची काळजी घेण्यासाठी काही सोप्या टिप्स सांगणार आहोत..

आजकालच्या धकाधकीच्या जीवनात सर्व काही अनहेल्दी झाले आहे. खाण्यापासून ते जीवनशैलीपर्यंत सर्व काही बदलले आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे आपल्या आरोग्यासोबतच आपल्या त्वचेवरही खूप परिणाम होतो, त्यामुळे त्वचेशी संबंधित अनेक समस्या आपल्याला बळी पडतात. आजकाल निस्तेज त्वचा, सुरकुत्या, पिंपल्स, ब्लॅक हेड्स आणि डाग यासारख्या समस्या सामान्य झाल्या आहेत. अशा स्थितीत आपण अनेक त्वचा उत्पादने वापरून पाहतो, परंतु काही काळानंतर या समस्या पुन्हा सामान्य होतात.



सर्व प्रथम एक वाटी पपई चांगली मॅश करून घ्या. त्यात 2 चमचे कच्चे दूध मिसळा. आता हे दोन्ही मिक्स करून चेहऱ्यावर चांगले लावा आणि 3 मिनिटे मसाज करा.

हे त्वचेवर क्लिन्झर म्हणून काम करेल आणि चेहऱ्याची त्वचा स्वच्छ करेल. आता कापूस आणि पाण्याच्या मदतीने चेहरा स्वच्छ करा.

**स्टेप 2** - चेहरा स्वच्छ केल्यानंतर एक वाटी पपई मॅश करा.

त्यात 2 चमचे मध मिसळा.

हे दोन्ही मिक्स करा आणि सुमारे 15 मिनिटे चेहऱ्यावर राहू द्या.

हा फेस मास्क त्वचेला खोल साफ करण्यास मदत करेल.

पाण्याच्या मदतीने चेहरा स्वच्छ करा.

आता टॉवेलने चेहरा स्वच्छ करा आणि सामान्य रुटीन फॉलो करा.

आठवड्यातून एकदा तरी तुमच्या चेहऱ्याच्या त्वचेवर घरगुती वस्तूंपासून बनवलेला हा फेसपॅक वापरून पहा.

तुमच्या त्वचेची काळजी घेतल्याने तुम्हाला तुमच्या चेहऱ्याच्या त्वचेत बदल दिसू लागतील.

## राशि भविष्य

**मेष** - तुमचे आवडते स्वप्न प्रत्यक्षात येईल. परंतु तुमचा उत्साह नियंत्रणात ठेवा. कारण खूप आनंदी होणे हे कधी कधी समस्येत टाकू शकते. जर तुम्ही लोन घेणार असाल आणि बऱ्याच दिवस याच कामात असाल तर, आजच्या दिवशी तुम्हाला लोन मिळू शकते.

**वृषभ** - नेहमीपेक्षा आज तुमची ऊर्जा कमी आहे असे तुम्हाला जाणवेल - म्हणून अतिरिक्त कामाचा बोजा घेऊ नका - थोडी विश्रांती घ्या आणि आजच्या भेटीगाठींच्या वेळा पुढे ढकला. आर्थिक जीवनात आज आनंद राहील. या सोबतच तुम्ही आज कर्जापासून मुक्त होऊ शकतात.

**मिथुन** - तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल. झटपट पैसा कमावण्याची तुम्हाला इच्छा होईल. भरपूर आनंदाचा दिवस, जेव्हा तुमचा जोडीदार तुम्हाला खुश करण्याचा प्रयत्न करेल. आपल्या प्रिय व्यक्तीचे अस्थिर अनियंत्रित वागणे तुमचा मूड खराब करू शकते.

**कर्क** - खेळावर काही रक्कम खर्च करा, कारण निंरतर चिरस्थायी तरुणाईचे ते गुपित आहे. आपल्या अपेक्षेप्रमाणे पैसे मिळणार नाही. क्वचित भेटीगाठी होणाऱ्या लोकांशी आज संपर्क करण्यासाठी चांगला दिवस. वैयक्तीक मार्गदर्शन तुमचे नातेसंबंध सुधारतील.

**सिंह** - आजच्या दिवशी चार भिंतीबाहेरची रम्य भटकंती, मेजवान्या तुमचा मूड चांगला ठेवतील. दीर्घकालीन दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून गुंतवणूक करणे गरजेचे आहे. इतरांवर प्रभाव टाकण्याची क्षमता तुम्हाला बक्षीस मिळवून देईल. तुमची प्रिय व्यक्ती तुमच्याकडून वचन मागेल - जे वचन तुम्ही पूर्ण करू शकणार नाही ते देऊ नका.

**कन्या** - तुम्ही आपल्या घरातील व्यक्तीकडून काही उधार घेतले असेल तर, आज त्यांना ते परत करा अथवा तुमच्या विरुद्ध ते कोर्टात कार्यवाही करू शकतात. पोस्टाने आलेले पत्र संपूर्ण कुटुंबासाठी आनंददायी बातमी घेऊन येईल. प्रणयराधन करण्याची शक्यता नाही आणि तुम्ही दिलेली महागडी, मौल्यवान भेटवस्तू याची जादू आज फारशी चालणार नाही.

**तूळ** - मद्यापान हा तुमच्या आरोग्याचा सर्वात वाईट शत्रू आहे, त्यामुळे तुमच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो हे तुम्हाला समजून घ्यावे लागेल. इच्छा आशीर्वाद म्हणून पूर्ण होतील आणि उत्तम नशिब फळफळेल - आणि पूर्वीच्या दिवसांमध्ये केलेली मेहनत फळाला येईल.

**वृश्चिक** - मनावर झालेल्या आघातामुळे तुम्हाला प्रचंड धैर्य आणि शक्ती पणाला लावावी लागेल. तुमच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे तुम्ही यावर सहजपणे मात कराल. ज्या लोकांनी कुठे गुंतवणूक केली होती आजच्या दिवशी तुम्हाला आर्थिक हानी होण्याची शक्यता आहे.

**धनु** - थोडयाशा मानसिक ताणातदेखील आरोग्य चांगले राहील. जर तुमची धन संबंधित काही गोष्ट कोर्ट-कचेरीत आटलेली असेल तर आज त्यात तुम्हाला विजय मिळू शकतो आणि तुम्हाला धन लाभ ही होऊ शकतो. मुलांकडून एखादी जबरदस्त बातमी मिळण्याची शक्यता आहे.

**मकर** - निराशावादी विचारसरणी टाळावी लागेल, कारण त्यामुळे तुमच्या संधी तर कमी होतातच, पण तुमच्या शरीराचा समतोल बिघडू शकतो. मोठ्या समुदायाशी संलग्न होण्यामुळे तुम्हाला आनंद, मनोरंजन लाभेल, पण तुमचा खर्च वाढता असेल.

**कुंभ** - व्यायामाच्या आधारे आपण आपले वजन नियंत्रणात ठेवू शकता. घरात काही कार्यक्रम असण्याने आज तुम्हाला खूप धन खर्च करावे लागू शकते ज्यामुळे तुमची आर्थिक स्थिती खराब होऊ शकते. अभ्यासाच्यावेळी देखील बाहेरील उपक्रमांत भाग घेण्याचा अतिरेक केल्याने पालकांच्या रोषास कारणीभूत व्हावे लागेल.

**मीन** - अतिखाणे आणि उच्च कॅलरी आहार टाळणे गरजेचे आहे. व्यापारात आज चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे. आजच्या दिवशी तुम्ही आपल्या व्यवसायाला नवीन उच्चता देऊ शकतात. आपल्या पालकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची आणि काळजी घेण्याची गरज भासेल.

# ईव्हीएम मशिन गोदामातील सातान्यात सीसीटीव्ही यंत्रणा कोलमडली

● सातारा : संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या सातारा लोकसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया शांततेने पार पाडली या सर्व ईव्हीएम मशीन सुरक्षिततेसाठी सातारा येथील गुदामा मध्ये बंदिस्त करण्यात आले त्यावर दिवस रात्र वॉच ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्याचे ठेके देण्यात आले परंतु काल दुपारी सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे राष्ट्रवादी सरचिटणीस राजकुमार पाटील यांच्या निदर्शनास आले त्यांनी तातडीने याबाबत लेखी तक्रार केली आहे . सदर ठेकेदारावरती योग्य ती कारवाई केली जाईल असे सातारा जिल्हा अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र डूडी यांनी स्पष्ट केले आहे.

सातारा लोकसभा मतदार संघासाठी ७ मे रोजी ६३.१६ टक्के मतदान झाले. झालेले मतदान हे ईव्हीएम मशिनमध्ये असून सर्व ईव्हीएम मशिन्स सातारा एमआयडीसी येथील डी.एम.ओ गोदामात सुरक्षित ठेवल्या गेल्या आहेत. त्या मशिसच्या सुरक्षितेसाठी पोलीस यंत्रणेबरोबरच सीसीटीव्ही आहेत. मात्र, हे सीसीटीव्ही दि.१० मे रोजी सकाळपासून बंद असल्याची बाब राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार प्रतिनिधी राजकुमार पाटील यांच्या निदर्शनास आली. त्यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे . त्यानुसार जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सी.सी.टी.व्ही. पुरवठा ठेकेदार यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

ईव्हीएम मशिनऐवजी बॅलेट पेपरवर निवडणूका घेण्यात याव्यात याकरता आंदोलनेही सातारा जिल्ह्यात झाले. दुसऱ्या बाजूला ईव्हीएम मशिनमध्ये कोणताही फेरफार करता येत नाही. ईव्हीएम मशिनमध्ये सुरक्षित मतदान करता येते. असे निवडणूक आयोगाकडून प्रचार आणि प्रबोधन करण्यात आले होते.

सातारा लोकसभेसाठी दि. ७ मे रोजी सकाळी सात ते सायंकाळी सहा वाजता




मतदानाची प्रक्रिया पार पडली. त्यावेळी झालेल्या मतदान प्रक्रियेचे सर्व ईव्हीएम मशिन्स हे सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी एमआयडीसीतील डी.एम.ओ. गोदामात सुरक्षित ठेवल्याचे मीडियाच्या काही प्रतिनिधींना सांगितले. त्याच्या दुसऱ्या दिवशी प्रशासकीय यंत्रणेतील काही अधिकाऱ्यांनी तेथे जावून सुरक्षीततेबाबतची तपासणी केली. डीएमओ गोदामामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा आहे त्याचबरोबर पोलीस सुरक्षाही आहे. असे असताना महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार शशिकांत शिंदे यांचे उमेदवार प्रतिनिधी राजकुमार पाटील यांनी सीसीटीव्ही यंत्रणा दि. १० रोजी सकाळपासून वारंवार बंद दिसत असल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे केली आहे.

ईव्हीएम मशिनच्या संरक्षणासाठी बसवलेली सी.सी.टी.व्ही.ची लिंक ही उमेदवार प्रतिनिधी यांच्याकडे असल्यामुळे ही बाब निदर्शनास आली. त्याच तक्रारीची दखल साताराचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी घेवून लगेच संबंधित ठेकेदारास कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. शनिवार दि. ११ रोजी दिवसभर त्याच तक्रारीच्या अनुषंगाने गोदाम परिसरात कार्यवाही सुरु होती. त्याबाबत गोपनीयता ही पाळण्यात आली होती.

**निवडणूक निर्णय अधिकारी तथा सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी या सीसीटीव्ही पुरवठा करणारे ठेकेदार मनेषकामर गणेशलाल सारडा सिद्धीविनायक सिक्युरिटी सिस्टिम लि. यास बजावलेल्या नोटीसीत म्हटले आहे की गोदाम परिसरातील सीसीटीव्ही कव्हरेज दि. १० च्या सकाळपासून बंद दिसत असल्याने आपले लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने सीसीटीव्ही पुरवठा केलेले संपूर्ण देयक आपणास अदा करण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी. तसेच यंत्रणा तत्काळ कार्यान्वित न केल्यास काळ्या यादीत नाव टाकले जाईल. अनामत रक्कम जप्त केली जाईल. याची नोंद घ्यावी. तसेच मतमोजणी होईपर्यंत स्वत: सदर ठिकाणी हजर रहावे. गोदाम सोडून कोठे जायचे असल्यास जिल्हाधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील, तरी जिल्हा मार्केटींग फेडरेशन गोदाम एमआयडीसी सातारा येथील सीसीटीव्ही यंत्रणा पूर्ण क्षमतेने योग्य रितीने चालू करण्याची कार्यवाही तत्काळ करण्यात यावी, अशा सुचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिल्या . या प्रकारामुळे ईव्हीएम मशीन व सीसीटीव्ही कॅमेरा यांचे काही साठे लोटे आहे का याचीही पोलीस यंत्रणेमार्फत तपासणी करावी अशी मागणी तोंडी स्वरूपात काही उमेदवारांनी केलेले आहे.**

## वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात काळवाडीत येथे बिबट्या जेरबंद



● पिंपळवंडी : काळवाडी (ता.जुन्नर) येथे वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात सोमवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास बिबट्या जेरबंद झाला. काळवाडी येथील रुद्र महेश फापाळे या आठ वर्षीय मुलाचा बुधवारी (ता.८) बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला होता. त्यानंतर वनविभागाने या परिसरात पिंजरे लावले होते. घटनास्थळापासून काही अंतरावर लावलेल्या पिंजऱ्यात सुमारे सहा वर्षे वयाची बिबट मादी जेरबंद झाली. या बिबट्याला माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात हलविण्यात आले आहे.

पिंपरी पेंढार येथे एका महिलेचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झालेला होता तसेच पिंपळवंडी येथील एक तरुणी बिबट्याच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेली होती. यानंतर वनविभागाच्या माध्यमातून या परिसरात अनेक पिंजरे लावलेले होते.चार दिवसात या पिंजऱ्यात एकूण पाच बिबटे जेरबंद झालेले आहेत तसेच काही दिवसांपूर्वी उंब्रज परिसरात देखील चार ते पाच बिबटे वनविभागाने पिंजऱ्यात जेरबंद केलेले होते. यावरून पिंपळवंडी, काळवाडी, उंब्रज व पिंपरी पेंढार या परिसरात बिबट्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसते.

## लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशीप्रमाणे नरेंद्र मोदींनाही ७५ वर्षानंतर राजकारणातून निवृत्त करणार का?: रमेश चेन्नीथला

■ देशभरात परिवर्तनाचे चित्र; मोदी सरकारचा पराभव होऊन इंडिया आघाडीचे सरकार येणार.
■ इंडिया आघाडीची १७ मे रोजी BKC मैदानावर जाहीर सभा; मल्लिकार्जून खर्गे, उद्धव ठाकरे, शरद पवार, केजरीवालांची उपस्थिती.
■ दिनांक १८ मे रोजी मुंबईत इंडिया आघाडीची संयुक्त पत्रकार परिषद.




● मुंबई - भारतीय जनता पक्षाने ७५ वर्ष वय झालेल्यांना सक्रीय राजकारणातून बाजूला केले आहे. भाजपा पक्ष संघटन मजबूत करणारे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी व मुरली मनोहर जोशी यांनाही ७५ वर्ष वयाचे कारण देऊन राजकारणातून बाजूला केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही याच नियमानुसार ७५ वर्ष झाल्यानंतर राजकारणातून निवृत्त करून अमित शाह यांना पंतप्रधान करणार का? या प्रश्नाचे उत्तर भारतीय जनता पक्षाने द्यावे, अशी मागणी काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केली आहे.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना रमेश चेन्नीथला पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्या भाषणात हिंदू-मुस्लीम, पाकिस्तान हे मुद्दे घेऊन धार्मिक विभाजन करण्याचा प्रयत्न करत आहेत. पश्चिम बंगालमध्ये मुस्लीम लोकसंख्या वाढली आहे असे नरेंद्र मोदी प्रचार सभेत म्हणाले. धार्मिक विभाजनाची भाषा करणे देशाच्या पंतप्रधानाला शोभत नाही. यातून जगात काय संदेश जातो, असा सवाल रमेश चेन्नीथला यांनी उपस्थित केला आहे. १० वर्षात सरकारने काय काम केले त्यावर नरेंद्र मोदी बोलत नाहीत. जनता मोदी सरकारच्या कारभाराला कंटाळली असून देशभर भाजपाविरोधी लाट आहे. लोकसभा निववडणुकीत भाजपाचा दारूण पराभव होत असून इंडिया आघाडीचे सरकार येणार असल्याचा विश्वास चेन्नीथला यांनी व्यक्त केला.

लोकसभा प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात मुंबईतील बीकेसी मैदानावर १७ मे रोजी इंडिया आघाडीची जाहीर सभा होणार आहे. या सभेला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल उपस्थित राहणार आहेत. तसेच १८ मे रोजी इंडिया आघाडीची संयुक्त पत्रकार परिषद होणार असल्याची माहिती रमेश चेन्नीथला यांनी दिली आहे.

या पत्रकार परिषदेला प्रभारी रमेश चेन्नीथला, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, माजी खासदार हुसेन दलवाई, महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा अलका लांबा, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव आशिष दुआ, बी. एम. संदीप, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, चरणसिंह सप्रा, महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा संध्या सव्वालाखे आदी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना मुरघास बनविण्याचे प्रशिक्षण; तालुका लघू पशुवैद्यकीय चिकित्सालयाचा उपक्रम



● उमरेड : तालुका लघू पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्यावतीने पिराया या गावातील पशुपालक शेतकऱ्याच्या बांधावर शेतकरी व पशुपालकांच्या मदतीने 'कमी कालावधीत चारा उपलब्धतेचा विमा काढण्यासाठी मुरघास बनवणे' या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण पार पडले. दुग्धव्यवसाय यशस्वीपणे चालविण्यासाठी मुरघास बनवण्याच्या महत्त्वाबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती करणे, हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

## Arvind Kejriwal's PA misbehaved with me: AAP MP Swati Maliwal

● NEW DELHI: AAP's Rajya Sabha MP Swati Maliwal on Monday went to the Civil Lines police station and alleged that a member of Delhi Chief Minister Arvind Kejriwal's personal staff misbehaved with her, police officials said.

Police has not yet received a formal complaint. Maliwal also made PCR calls after the alleged verbal spat, officials said. The two calls were made at 10 am, they said.



A team from the Civil Lines police station reached the chief minister's residence after that. There was no immediate reaction from either the chief minister's residence or from Delhi's ruling Aam Aadmi Party.

## n northern Andhra Pradesh, urban voters seek gensets in return for votes

● Vijayawada : A wave of demonstrations swept through at least five places across Andhra Pradesh on Sunday, with many people demanding money from political parties in exchange for votes. The issue is not new in the state, but as inflation rises, so does the price for votes.

Sources said cash-for-votes in various assembly and parliamentary constituencies ranged from Rs 1,000 to Rs 6,000, reports Madhu Rasala.



Polling will be held in AP for 175 assembly and 25 LS seats on Monday. Campaigning concluded Saturday evening, but the alleged distribution of money continued in some places. In Palnadu's Sattenapalli, voters from 18th ward took to the streets to protest, claiming they were promised money for their votes, but they never received it.

# Maharashtra records 91 cases of new Covid subvariant 'FLiRT': All you need to know

● PUNE: The Maharashtra government has detected 91 instances of the novel Covid-19 Omicron subvariant KP.2, which has surpassed the previously dominant JN.1 variant and is currently the primary driver of cases in several nations. Pune reported the highest number of KP.2 cases at 51, followed by Thane with 20 cases.

Maharashtra first recognized KP.2 cases in January, and by March and April, it had become the predominant strain in the region.

Dr Rajesh Karyakarte, the state's genome sequencing coordinator, noted that despite the rise in cases, there has been no corresponding increase in hospitalizations or severe cases. The slight surge in cases witnessed by the state in March, with an average of around 250 detections, is likely due to the spread of the KP.2 variant, which evolved from JN.1, the dominant Covid strain at the end of 2023.

Apart from Pune and Thane, seven cases each were reported in Amravati and Aurangabad, while Solapur had two cases and



Ahmednagar, Nashik, Latur, and Sangli had one case each of the KP.2 variant. Notably, no cases were reported from Mumbai.

The recently identified group of variants, collectively known as "FLiRT", primarily consists of the KP.1.1 and KP.2 strains. The nomenclature of these strains is derived from the specific mutations they possess, with one strain containing mutations represented by the letters "F" and "L", while the other strain features mutations denoted by the letters "R" and "T". This subvariant was first identified globally in January and is now the dominant strain in the United States.

Characteristics of KP.2 variant

A recent study conducted by Japanese researchers has revealed that the KP.2 (JN.1.11.1.2) variant, which is a descendant of JN.1, possesses three distinct substitutions in the S protein, including S:R346T and S:F456L, as well as an additional substitution in a non-S protein. These genetic changes have resulted in a notable difference in the reproduction number of KP.2 compared to its predecessor, JN.1.

The findings indicate that the reproduction number of KP.2 is 1.22-, 1.32-, and 1.26-times higher than that of JN.1 in USA, United Kingdom, and Canada, respectively." This suggests that KP.2 has a higher transmission rate than JN.1 in these countries. Surprisingly, despite its increased reproduction number, the study also found that the infectivity of KP.2 is significantly lower than that of JN.1, with a 10.5-fold difference.

Symptoms of KP.2 and JN.1 variants

The most recent information regarding COVID symptoms and long-term effects suggests that the KP.2 and JN.1 variants, which currently account for approximately 16% of cases, likely cause symptoms similar to those associated with other variants. These symptoms include sore throat, runny nose, coughing, head and body aches, fever, congestion, fatigue and, in severe cases, shortness of breath. However, compared to the early stages of the pandemic, fewer people now experience loss of taste and smell. Patients who are often caught off guard by the fact that COVID can also cause gastrointestinal symptoms such as diarrhea, nausea, and vomiting, which are sometimes mistaken for signs of norovirus.

For individuals who have previously contracted COVID, subsequent infections tend to be as mild or milder than their initial case. Although the incidence of long COVID is lower now compared to the beginning of the pandemic, Fikadu Tafesse, a virus expert at Oregon Health & Science University, cautions that repeated infections increase the risk of developing long COVID.

### Public health measures

■ To stay safe from COVID-19, it is essential to adopt preventive measures such as wearing masks in crowded spaces, maintaining hand hygiene, practicing physical distancing, avoiding large gatherings and poorly ventilated areas, disinfecting frequently touched surfaces, staying home when feeling unwell, staying informed about local guidelines and supporting community vaccination efforts.

■ By adhering to these practices, individuals can significantly reduce the risk of contracting and spreading the virus, contributing to the collective effort in mitigating the impact of the pandemic.

# काँग्रेसकडून 'जय मराठी'चा नारा

## काँग्रेस नेते आणि खासदार जयराम रमेश यांचं वचन

● मुंबई, प्रतिनिधी :



लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी मतदान प्रक्रिया पार पडत असताना काँग्रेसकडून मराठी भाषेसंदर्भात मोठी घोषणा करण्यात आली आहे. "इंडिया आघाडीचे सरकार स्थापन होताच मराठीला अभिजात भारतीय भाषेचा दर्जा दिला जाईल, हे वचन भारतीय राष्ट्रीय काँग्रेस देत आहे," असं काँग्रेस नेते आणि खासदार जयराम रमेश यांनी जाहीर केलं आहे. त्यामुळे ऐन निवडणुकीत आता काँग्रेसने 'मराठी कार्ड' खेळल्याची चर्चा रंगत आहे.

जयराम रमेश यांनी एक्सवर पोस्ट लिहीत म्हटलं आहे की, "डॉ. मनमोहन सिंग हे पंतप्रधान असताना तामिळ, संस्कृत, कन्नड, तेलगू, मल्याळम आणि ओडिया या भाषांना अभिजात भारतीय भाषा म्हणून दर्जा देण्यात आला होता. ११ जुलै २०१४ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मराठीला अभिजात भारतीय भाषा म्हणून घोषित करण्यासाठी अहवाल सादर केला होता. सदर अहवालावर आताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षापासून काहीही निर्णय घेतला नाही. इंडिया आघाडीचे सरकार स्थापन होताच मराठीला अभिजात भारतीय भाषेचा दर्जा दिला जाईल, हे वचन भारतीय राष्ट्रीय काँग्रेस देत आहे."

केंद्र सरकारवर टीकास्त्र

मराठी भाषेला अभिजात भारतीय भाषेचा दर्जा देण्याच्या मुद्द्यावरून जयराम रमेश यांनी केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. "मराठीच्या समृद्ध अभिजात इतिहासाचा पुरावा देणारा सबळ अहवाल यूपीएच्या अखेरीस सादर शासनाकडे करण्यात आला. असं असूनही मागील १० वर्षातील काळात नरेंद्र मोदींनी एकाही भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला नाही किंवा नोंद केलेली नाही. मार्च २०२२ मध्ये काँग्रेस खासदार श्रीमती रजनी पाटील यांनी याबद्दल राज्यसभेत आवाज उठवला होता. तरी पण या बाबतीत पूर्ण २ वर्षे उलटूनही पंतप्रधान मौन आणि निष्क्रिय आहेत," असा हल्लाबोल जयराम यांनी केला आहे.

दरम्यान, "काँग्रेस पक्ष सर्व भारतीय भाषांचा आदर करतो आणि १० वर्षातील काळात डॉ. मनमोहन सिंग यांनी ६ वेगवेगळया भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला, त्यांनी निरंतर भाषा विकासाला आणि संशोधनाला पाठिंबा दिला. आम्हाला विश्वास आहे की, महाराष्ट्रातील मतदार या पंतप्रधानांना त्यांच्या मराठीबद्दलच्या असलेल्या त्यांच्या उदासीनतेबद्दल चांगलाच धडा शिकवतील," असंही जयराम रमेश यांनी म्हटलं आहे.

# मोकळ्या जागेत तंबू बांधत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांची कारवाई

● नागपूर, प्रतिनिधी :




एका फार्महाऊसजवळील मोकळया जागेत बांबूच्या सहाय्याने तंबू बांधत आरोपींनी चक्क जुगारअड्डा सुरू केला होता. पोलिसांनी तेथे धाड टाकत १३ जणांविरोधात कारवाई केली. गुन्हेशाखेच्या युनिट क्र.२ च्या पथकाने गिट्टीखदान पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई केली.

पिटेसूर वस्तीच्या मागील बेग फार्म हाऊसजवळ काही लोक जुगार खेळत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. पोलिसांनी सोमवारी रात्री दोन वाजताच्या सुमारास तेथे धाड टाकली असता काही जण जुगार खेळताना आढळले. पोलिसांनी सुनिल रम्मू पटेल (४०, महालक्ष्मी नगर, गोरेवाडा), किशोर मधुकरराव मेघरे (५३, अखाडा चैक, वर्धा रोड, सोमलवाडा), रंजीत त्र्यंबकराव राऊत (५४, पंचशीलनगर), मयुर गंगाधर ठवरे (३६, हिवरीनगर), संजय गजानन मोहरले (४७, रामबाग, ईमामवाडा), हरीश रामदास खिलवानी (५६, एमआयजी कॉलोनी, जरीपटका), धरमपाल शिवराम धमके (४२, राहुल नगर, सोमलवाडा), घनश्याम चेतनदास साधवानी (५१, दिया अपार्टमेंट, जरीपटका), सौरभ राधेश्याम बावणे (२१, मस्कासाथ, पाचपावली), नविन सुरेश गौर (२९, हंसापुरी, लोधीपुरा), हितेश फुलचंद्र करवाडे (३४, जुना बगडगंज, कुंभार टोली, लकडगंज), व सुधीर भाऊराव धुमाळे (३५, गोरेवाडा जुनी वस्ती) यांचा त्यात समावेश होता. पोलिसांनी विचारणा केली असता गणेश उर्फ घुई आनंदराव चाचेरकर (३५, गोरेवाडा) हा जुगारअड्डा चालवत असल्याची बाब समोर आली. पोलिसांनी घटनास्थळावरून रोख १.०३ लाख, दोन कार, आठ दुचाकी, जनरेटर, ९ मोबाईल असा २१.४३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

# मुंबईतील १३० वर्षे जुना बेलासिस पूल पाडणार, रस्त्यांच्या कामासाठी वाहतुकीत बदल



● मुंबई प्रतिनिधी :

मुंबई सेंट्रल आणि ग्रँट रोड दरम्यान असलेला ब्रिटीशकालीन १३० वर्षे जुना बेलासिस पूल लवकरच पाडून पुनर्बांधणी केली जाणार आहे. निवडणुकीनंतर हे पाडकाम होणार असल्याचे सांगितले जाते आहे. दरम्यानच्या काळात पुलाच्या दोन्ही बाजूंच्या पोहोच रस्त्यांचे काम होणार असल्याने पूल शनिवारी मध्यरात्रीपासून अवजड वाहनांसाठी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पुलाच्या कामासाठी मुंबई महापालिका तब्बल ७२ कोटी २१ लाख ९३ हजार रुपये खर्च करणार आहे. पश्चिम रेल्वे आणि मुंबई महापालिकेतर्फे या पुलाचे काम होणार आहे.

जुलै २०१८ मध्ये अंधेरी पूर्व व पश्चिमेला जोडणारा गोखले पूल कोसळून दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला. तर १४ मार्च २०१९ मध्ये सीएसएमटी स्थानकाजवळील हिमालय पूल कोसळून सात जणांचा मृत्यू झाला, तर ३१ जण जखमी झाले होते. या पुलांच्या दुर्घटनेनंतर मुंबईतील सर्वच पुलांचे ऑडिट करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला होता. आयआयटी मुंबईने पुलांचे ऑडिट केले असता मुंबई सेंट्रल व ग्रँट रोड दरम्यान असलेला बेलासिस पूल धोकादायक झाल्याने पुलाची तातडीने दुरुस्ती किंवा नवीन बांधण्याची शिफारस केली होती. त्यानुसार हा पूल पाडून नव्याने बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पश्चिम रेल्वे या पुलासाठी २४ कोटी रुपये खर्च करणार असून कामाचा सर्वाधिक भार मुंबई महापालिका उचलणार आहे.

पुलाचा रेल्वे रुळांवरील भाग पाडून त्याच्या पुनर्बांधणीसाठी पश्चिम रेल्वेने कंत्राटदार नियुक्त केला आहे. महापालिकेने आपल्या हद्दीतील कामासाठी कंत्राटदार नियुक्त केला आहे.

# पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी प्रजासत्ताक सामाजिक सेवा संस्था जनहित याचिकेतून न्यायाच्या प्रतीक्षेत

● कोल्हापूर प्रतिनिधी :



पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी साडे नऊ वर्षापूर्वी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. परंतू या समितीच्या स्थापनेचे फलित काय अशी विचारणा 'प्रजासत्ताक'संस्थेचे दिलीप देसाई यांनी केली आहे.

देसाई यांनी याबाबत न्यायालयात याचिका दाखल केली असून सध्याच्या प्रदूषणाची पाहणी करण्यासाठी वेळ मिळावी यासाठी देसाई यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी यांना मेलव्दारे निवेदन पाठवले आहे.

देसाई निवेदनात म्हणतात, सन १९९७ मध्ये उच्च न्यायालयाने पंचगंगा नदी प्रदूषण रोखण्यासाठी दिलेल्या निर्देशांचे पालन न झाल्यामुळे प्रजासत्ताक सामाजिक सेवा संस्थेने २०१० साली जनहित याचिका दाखल केली. याच मुद्द्यावर दाखल झालेल्या इतर याचिकांसोबत या याचिकेची एकत्रित सुनावणी होऊन दिनांक १० नोव्हेंबर २०१४ रोजी उच्च न्यायालयाने पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठीच्या प्रयत्नांवर देखरेख ठेवण्यासाठी आणि अंमलबजावणीसाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. ही समिती नेमून साडे नऊ वर्षे झाली. परंतू प्रदूषण रोखण्यासाठी प्रभावी अशी उपाययोजना झालेली नाही असे दिसून येत आहे. म्हणूनच नेमके यासाठी काय प्रयत्न झाले, त्यातून किती यश मिळाले याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. यासाठी पंचगंगा नदीची आजची परिस्थिती, पंचगंगा नदीत मिसळणाऱ्या नाल्यांची सद्यस्थिती, केलेल्या उपाययोजना आणि त्यांचा प्रभाव या बाबींची पाहणी करून त्याचा अहवाल न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. तरी आपण या सर्व ठिकाणांची संयुक्त पाहणी करण्याकामी आपल्या कार्यालयाचा दिनांक आणि वेळ कळवावा अशी मागणी देसाई यांनी केली आहे.

# नवरा-बायकोचे भांडण, राग शहरावर, पुणे शहरात बॉम्बस्फोट करण्याची दिली धमकी

● पुणे प्रतिनिधी :



पत्नीच्या प्रेमात पडलेल्या या व्यक्तीने बायको नांदण्यासाठी येत नसल्यामुळे पुणे पोलीस कंट्रोल रुमला फोन केला. शहरात सात ठिकाणी बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी दिली. लोकसभा निवडणुकीचे मतदान सुरु असताना मिळालेल्या या धमकीमुळे पुणे पोलिसांना जोरदार धक्का बसला.

पुणे शहरात धक्कादायक घटना घडली आहे. कौटुंबिक वादातून शहर वेठीस धरण्याचा प्रकार घडला आहे. नवरा-बायकोच्या भांडणाचा राग शहरावर काढण्याचा प्रकार घडला आहे. पत्नीच्या प्रेमात पडलेल्या या व्यक्तीने बायको नांदण्यासाठी येत नसल्यामुळे पुणे पोलीस कंट्रोल रुमला फोन केला. शहरात सात ठिकाणी बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी दिली. लोकसभा निवडणुकीचे मतदान सुरु असताना मिळालेल्या या धमकीमुळे पुणे पोलिसांना जोरदार धक्का बसला. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तपास सुरु केला आहे.

पुणे शहरात मागच्या काही दिवसांपासून गुन्हेगारी वाढत आहे. यापूर्वी कोयता गँगने पुणे शहरात धुमाकूळ घातला होता. त्यानंतर आता गोळीबारच्या घटना मागील महिन्यात चार वेळा घडल्या. गुन्हेगारीप्रमाणे कौटुंबिक वाद आणि कलहसुद्धा समोर येत आहे. किरोकळ कारणावरुन कुटुंबात वाद होत आहे. काही दिवसांपूर्वी एका कुटुंबामध्ये चिकनसाठी भांडण झाले होते. त्यानंतर आईने आणि मुलींनी मिळून बापाला चोपून काढले होते. आतादेखील किरोकोळ कारणावरुन शहराला वेठीस धरण्याचा प्रकार आला आहे. त्या व्यक्तीने बायकोचा राग काढण्यासाठी बॉम्ब करण्याची धमकी दिली.

पुणे पोलीस नियंत्रण कक्षाला फोन आला. बायको नांदण्यासाठी परत आली नाही तर पुण्यात बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी त्या फोनमधून देण्यात आली. त्या व्यक्तीने सात ठिकाणी बॉम्बस्फोट करण्याची धमकी दिली. पुणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला हा फोन आल्याने खळबळ उडाली. पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत चौकशी सुरु केली. पुणे पोलीस लोकसभा निवडणुकीच्या मतदानाच्या बंदोबस्तात व्यस्त असताना हा धमकीचा फोन आला.

# बारामतीत ईव्हीएम मशीन ठेवलेल्या गोदामातील CCTV बंद

## रोहित पवारांनी व्यक्त केली शंका

● बारामती प्रतिनिधी :





राज्यात चौथ्या टप्प्यातील 11 लोकसभा मतदार संघात आज मतदान पार पडत आहे. यादरम्यान बारामतीतून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. बारामती लोकसभा मतदारसंघातील ईव्हीएम ठेवलेल्या गोदामातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचं समोर आलं आहे. गेल्या ४५ मिनिटांपासून हे सीसीटीव्ही बंद असल्याची माहिती आहे. याबाबत शरद पवार गटाकडून संशय व्यक्त केला जात आहे.

याप्रकरणी सुप्रिया सुळे यांचे निवडणूक प्रतिनिधी लक्ष्मीकांत खाबिया यांनी यात काही काळंबेरं तर नाही ना अशी शंका उपस्थित होत असल्याचे म्हंटले आहे. "बारामती लोकसभा मतदारसंघाच्या ईव्हीएम मशीन ज्या गोदामात ठेवण्यात आल्या आहेत. त्या गोदमाचे सीसीटिव्ही सकाळी 10.50 पासून बंद पडलेले आहे. त्यामुळं यात काही काळंबेरं तर नाही ना अशी शंका माझ्यासारख्या कार्यकर्त्यांच्या मनात आल्याशिवाय राहत नाही," असे खाबिया यांनी म्हंटले आहे. पुढे त्यांनी सांगितले की, "मी त्या विभागातील जे अधिकारी आहेत त्यांनाही फोन केला. पण त्यांचा काहीच रिप्लाय आला नाही. संबंधितांशी सतत संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहे. तिथे कोणीही टेक्निशियन नाही. आमचे कार्यकर्ते तेथे उपस्थित आहेत पण त्यांना गोदाम दाखवत नाहीत. पोलिस म्हणतात आम्हाला काही सूचना मिळालेल्या नाहीत. हे चालले तरी काय?", असा सवालही शरद पवार गटाचे कार्यकर्ते लक्ष्मीकांत खाबिया यांनी केला आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनीही प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारावर संताप व्यक्त केला आहे. "बारामती लोकसभा मतदारसंघातील EVM ठेवलेल्या गोडवूनमधील CCTV ४३ मिनिटं बंद असल्याची माहिती ही धक्कादायक आहेच पण काही गैरप्रकार करण्यासाठी तर जाणीवपूर्वक हा प्रकार केला नाही ना, अशी दाट शंका येते."

"ज्याप्रमाणे हॉस्पिटलमध्ये व्हेंटिलेटर आवश्यक असतं त्याप्रमाणे EVM च्या गोडावूनमध्येही CCTV यंत्रणा सुरू असणं आवश्यक आहे.

# उन्हाळी सुट्टीत प्रवाशांना दिलासा

## अटलसेतूवरुन शिवनेरीच्या १५ नव्या फेऱ्या, प्रवासवेळेत मोठी बचत

● मुंबई प्रतिनिधी :



उन्हाळी सुट्ट्यांमुळे राज्यातील सर्वच शहरांमध्ये प्रवासी वर्दळ वाढली आहे. मुंबई-पुणेदरम्यान प्रवासी संख्येतही मोठी वाढ झाली असून, हा प्रवास वेगवान व्हावा आणि प्रवाशांच्या वेळेत बचत व्हावी, यासाठी राज्य परिवहन महामंडळाने अटल सेतूमार्गे धावणाऱ्या वातानुकूलित शिवनेरीच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई-पुणे अटल सेतूवरून आता शिवनेरीच्या १५ फेऱ्या धावणार आहेत.

'महाराष्ट्र टाइम्स'च्या पाठपुराव्यानंतर सर्वप्रथम २० फेब्रुवारी रोजी पुणे-मंत्रालय आणि स्वारगेट-दादर शिवनेरी अटलसेतूवरून धावली होती. पहिल्या फेरीतील शिवनेरीला जवळपास ७० टक्के प्रवासी भारमान लाभले होते. अटल सेतूमार्गे धावणाऱ्या शिवनेरीला वाशीतील वाहतूककोंडीचा सामना करावा लागत नाही. यामुळे अटलसेतूमार्गे धावणाऱ्या शिवनेरीच्या फेऱ्यांची संख्या वाढवण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात आली होती.

मे महिन्याची सुट्टी आणि मुंबई-पुणे प्रवासासाठी वाढलेली गर्दी लक्षात घेता मुंबई, शिवाजी नगर(पुणे) आणि स्वारगेट विभागाने प्रत्येकी पाच शिवनेरी अटलसूतेमार्गे चालवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे अटलसेतूमार्गे धावणाऱ्या शिवनेरीची संख्या दोनवरून १७ वर पोहोचली आहे. यामुळे प्रवाशांचा प्रवास वेळ साडेचार तासांवरून साडेतीन तासांवर येईल, असे एसटीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

दादरवरून स्वारगेटसाठी (पुणे) पहिली शिवनेरी पहाटे ५ वाजता सुटते. त्याचवेळी स्वारगेटवरून दादरसाठी शिवनेरी रवाना होते. मंत्रालय (दादर)-पुणे रेल्वे स्थानक ही शेवटची शिवनेरी रात्री ११ वाजता रवाना होते. रोज मुंबई-पुणे मार्गावर साधारण अर्ध्या तासाच्या फरकाने शिवनेरीच्या एकूण ४३ फेऱ्या पूर्ण होतात.

# शरद पवारांकडून सुपारी घेऊन संजय राऊतांनी उबाठा संपवली; मनसेचा जोरदार पलटवार

● मुंबई प्रतिनिधी :

ज्या दिवसापासून आम्ही पाठिंबा जाहीर केलाय तेव्हापासून उबाठाच्या तंबूत भीती पसरली आहे. त्यामुळे जुने काहीतरी काढण्याचं सुरू आहे. राऊतांना उबाठा संपवण्याची सुपारी शरद पवारांनीच दिलीय असा पलटवार मनसे नेते संदीप देशपांडे यांनी संजय राऊतांवर केला. संदीप देशपांडे म्हणाले की, संजय राऊतांच्या जुन्या गोष्टी काढल्या तर पळताभूई थोडी होईल. जुन्या गोष्टी काढल्या तर संजय राऊतांच्या पार्श्वभागाला पाय लावून पळायला लागेल अशी त्यांची परिस्थिती होईल. सुपारी जर गळयात अडकली तर गिळताही येणार नाही, बाहेरही काढता येणार नाही. त्यामुळे सांभाळून बोला. जुन्या गोष्टी सगळयांच्याच काढल्या तर कुणालाच तोंड दाखवायची जागा उरणार नाही. राजकीय आरोप प्रत्यारोप होते त्या होत राहतात. पण ज्यापद्धतीने सत्तेसाठी संजय राऊत इथून तिथून उड्या मारतात. शरद पवारांच्या मांडीवर बसतात त्याला सुपारी घेणे म्हणतात. राऊतांना उबाठा संपवण्याची सुपारी शरद पवारांनीच दिलीय. ते काम राऊत व्यवस्थितपणे करतायेत असा टोला त्यांनी लगावला.

त्याशिवाय जितेंद्र आव्हाडांना कुणाचा शेवट जवळ आलाय हे सांगण्याची लायकी नाही. राज ठाकरे संपवणारे संपले, हे जितेंद्र आव्हाडांनी लक्षात ठेवावे. आम्ही बिनशर्त पाठिंबा दिला असला तरी स्वत: महायुतीच्या प्रचारात उतरलोय. त्यामुळे उबाठा गटात भीती आहे. यांच्या आरेला कारे करणारे हे महाराष्ट्र सैनिकच आहेत. यांची चिल्लीपिल्ली माहिती आहे. आज गुजरातींबाबत बोलतात. जलेबी ना फाफडा, उद्धव ठाकरे आपडा, केम छो वरली हे बोर्ड कुणी लावले? त्यामुळे मराठीवरील यांचे प्रेम बेगडी आहे. जेव्हा मतदान हवे असते तेव्हाच या लोकांना मराठी माणूस आठवतो. २५ वर्ष महापालिकेत असताना मराठी माणसांसाठी काय केले? जे मराठी माणसं मुंबईत राहत होते. त्यांना कल्याण डोंबिवली, वसई विरार, नवी मुंबईत पाठवण्याचं काम उद्धव ठाकरेंनी केले असा सवालही संदीप देशपांडे यांनी विचारला.

दरम्यान, शिवतीर्थाने अनेक ऐतिहासिक सभा पाहिल्या. आचार्य अत्रेपासून बाळासाहेब ठाकरे, लालकृष्ण अडवाणी, अटलबिहारी वाजपेयी यांची सभा पाहिलीय. त्यात इतिहासाच्या पठडीतील अजून एक सभा १७ तारखेला शिवतीर्थावर नरेंद्र मोदी आणि राज ठाकरेंची होईल असं मनसे नेते संदीप देशपांडे यांनी सांगितले.